शनिवार, ५ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -११
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 5 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-11 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# सत्यमेव जयते !

## राहुल गांधींचा संसदेत परतण्याचा मार्ग मोकळा



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मोदी आडनाव बदनामीच्या खटल्यात गुजरात उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय रद्द करत सर्वोच्च न्यायलायने राहुल गांधी यांना मोठा दिलासा दिला आहे. राहुल गांधींचा संसदेत परतण्याचा मार्ग या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. हायकोर्टाने शिक्षा सुनावताना पूर्ण विचार केला नाही असे आता सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य योग्य नव्हते, सार्वजनिक आयुष्यात बोलताना भान बाळगले पाहिजे असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.**



माननीय उच्चतम न्यायालय को न्यायपूर्ण फैसला देने के लिए धन्यवाद। सत्यमेव जयते। गौतम बुद्धांचे वचन प्रियंका गांधींनी ट्विट केले आहे. तीन गोष्टी कधीच लपत नसतात. सूर्य, चंद्र आणि सत्य, असे म्हणत प्रियंका गांधी यांनी कोर्टाचे आभार मानले आहेत.



"राहुल गांधी यांना मिळालेला दिलासा म्हणजे संविधान, लोकशाही आणि भारताचा विजय आहे. भारताच्या जनतेचा हा विजय आहे. लोकशाहीचा विजय आहे. यामुळे खूप मोठा फायदा देशाच्या लोकांना झाला आहे. जो व्यक्ती देशाच्या हितासाठी, सत्येसाठी, देशाला मजबुती आणण्यासाठी, देशाच्या तरुणांसाठी, महागाईविरोधात लढतो आणि लढता लढता लोकांना जागृत करण्याकरता कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत ४ हजार किमीपेक्षाही जास्त चालत गरिबांना भेटतो, लहान मुलांना भेटतो, आज मी समजतो की तुमच्या सर्वांचे आशिर्वाद आमच्यासोबत आहेत", असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

मोदी आडनावाची मानहानी केल्या प्रकरणी राहुल गांधी यांना गुजरातच्या उच्च न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर लोकसभा सचिवालयाने राहुल गांधींची खासदारकी रद्द केली होती. या निर्णयाविरोधात राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे त्यामुळे राहुल गांधी यांना त्यांची खासदारकी परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे

आडनावाच्या बदनामीच्या खटल्यावर शिक्षा सुनावत असताना राहुल गांधींना गुजरात न्यायालयाने सर्वाधिक असलेली दोन वर्षांची शिक्षा सुनावली. त्यांची खासदारकी रद्द व्हावी म्हणून ही शिक्षा सुनावण्यात आली का ? त्यापेक्षा एक दिवसाची शिक्षा जरी कमी असती तर त्यांची खासदारकी रद्द झाली नसती. त्यामुळे या प्रकरणातील जास्तीत जास्त दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली हे हेतुपुरस्सर करण्यात आले का ? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे. राहुल गांधी यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश बी. आर. गवई, जस्टिस पी. एस. नरसिंहा आणि जस्टिस संजय कुमार यांच्या पीठाने सुनावणी केली. राहुल गांधींच्या वतीने अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद केला तर दुसऱ्या बाजूने महेश जेठमलानी यांनी युक्तिवाद केला. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून विरोधकांनी मोदी सरकारवर अविश्वास प्रस्ताव आणला आहे. अशा वेळी राहुल गांधी यांना त्यांची खासदारकी परत मिळणार असल्याने विरोधकांचा आत्मविश्वास दुणावला आहे.



**राहुल गांधी यांच्या शिक्षेला स्थगिती दिल्याचा आनंद काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर व्यक्त केला. तसेच राज्यभर काँग्रेस कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटत जल्लोष केला.**

# पावसाळी अधिवेशन जनतेच्या तोंडाला पाने पुसणारेच ठरले

## नाना पटोले यांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पावसाळी अधिवेशनच्या शेवटच्या दिवशी विरोधी पक्षाकडून अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात येतो, हा प्रस्ताव राज्यातील जनतेचे प्रश्न मांडणारा असतो पण विरोधी पक्षाच्या या प्रस्तावाची सत्ताधारी पक्षाकडून थट्टा करण्यात आली. भाजपाप्रणित सरकार जनतेच्या प्रश्नांवर गंभीर नाही. महागाई कमी करण्यासाठी या सरकारकडे कोणतेही धोरण नाही. सामान्य जनतेचे जगणे कठीण झाले आहे. १०-१५ हजार रुपयांच्या पगारात शहरातील कुटुंबाला खर्च परवड नाही. नुकसानभरपाई अजून मिळालेली नाही. हे शेतकरीविरोधी सरकार असून केवळ घोषणा केल्या जात आहेत. अधिवेशनात सरकारने जनतेच्या तोंडाला पानं पुसली आहेत, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

विधानसभेत विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, महागाई दिवसेंदिवस वाढत असून लोकांचे जगणे महाग झाले आहे, याचा सत्ताधारी आंनद व्यक्त करत आहेत का ? महागाईवर या सरकारकडे काय उत्तर आहे. राज्यस्थान सरकार ५०० रुपयात सिलिंडर देते महाराष्ट्र सरकार सिलिंडरचे दर कमी करणार आहे का ? हा खरा प्रश्न आहे. राजस्थान सरकारने १० लाखापर्यंत खाजगी व शासकीय हॉस्पिटलमध्ये मोफत उपचाराची सोय केली आहे, सरकराने ती जबाबदारी घेतली आहे. त्यासाठी कागदपत्रे जोडावी लागत नाहीत. मोफत आरोग्य देणे हे सरकारचे काम आहे. या सरकारने शासकीय रुग्णालयात सर्व उपचार मोफत देण्याची घोषणा केली, यात नवे काय ? सरकारी रुग्णालयात मोफतच उपचार होतात. पण सरकारी दवाखानेच आजारी पडलेले आहेत, मशिनरी आहेत पण डॉक्टर व नर्सेस नाहीत अशी अवस्था आहे आपल्या आरोग्य विभागाची. सरकार आरोग्याचा कायदा करून प्रत्येक व्यक्तीला खाजगी व सरकारी रुग्णालयात मोफत आरोग्य सेवा देणार असा कायदा आणणार आहे का, ह्याचे उत्तर दिले पाहिजे. महागाई कमी करण्यात राज्य व केंद्र सरकारकडे धोरण नाही. राज्य सरकारने विद्युत दर वाढवले आहेत. दोन बल्ब असणाऱ्यांनाही हजाराचे बील येत आहे. शेतकऱ्यांचे तर बेहाल सुरु आहेत, १२ तास वीज देण्याची घोषणा सरकारने केली पण ८ तासही विज मिळत नाही. शेतातील उभी पीकं जळून जात आहेत. विद्यूत डीपी बसवण्याबाबतही राज्य सरकारची अन्यायी व्यवस्था आहे. मुंबई विद्यापीठातील लॉ अकादमीच्या दोन मुलींना हॉस्टेलमध्ये जागा नाही म्हणून हाकलून लावले. त्या मुली ओबीसी कोट्यातून आल्या होत्या. ग्रामीण भागातून मुंबईत शिकण्यासाठी आलेल्या मुलींना हाकलून लावता हा ओबीसीवरचा अत्याचार आहे. भटके, विमुक्त, आदिवासींवरही हे सरकार अन्याय करत आहे. चर्चगेट येथील सावित्रिबाई फुले हॉस्टेलमध्ये एका मुलीवर अत्याचार करुन तीची हत्या करण्यात आली त्यानंतर मुलींच्या सुरक्षेवर ठोस भूमिका सरकारने घ्यायला हवी होती पण तीही घेतली नाही. तीन आठवड्यांच्या या अधिवेशनात विरोधकांना पूर्ण वेळ मिळाला नाही ही खंत आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

# मी विवाहित आहे, त्यामुळे मला राग येत नाही : सभापती धनखड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मणिपूरच्या मुद्द्यावरून संसदीय पावसाळी अधिवेशन गाजत आहे. विरोधकांनी दोन्ही सभागृह दणाणून सोडले आहे. पंतप्रधानांनी सभागृहात याबाबत निवेदन सादर करावे, यावर विरोधक आग्रही आहेत. या मुद्द्यावरून आजही राज्यसभेत चर्चा सुरू होती. त्यावेळी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्यात चांगलीच जुंपली. यावेळी मी ४५ वर्षांपासून विविहित आहे, त्यामुळे मला राग येत नाही, असं जगदीप धनखड म्हणाले. त्यामुळे सभागृहात खसखस पिकली.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी खरगे यांना बोलण्याची संधी दिली. परंतु, लागलीच त्यांना खाली बसण्याची विनंती केली. तुम्ही जरा रागात आहात वाटते, असे खरगे म्हणाले. त्यावर जगदीप धनखड म्हणाले की, मी ४५ वर्षांपासून विवाहित आहे. मला कधीच राग येत नाही.

धनखड यांच्या या वक्तव्यानंतर सभागृहात एकच हशा पिकला. चिदंबरम हे ज्येष्ठ वकिल आहेत. या सभागृहातील ज्येष्ठ नेते आहे. त्यांनाही माहित असेल की आम्हाला आमचा राग अधिकाऱ्यांना दाखवण्याचा अधिकार नाही. तुम्ही एक अधिकारी आहात, असेही धनखड खरगे यांना म्हणाले. माझी पत्नी या सभागृहाची सदस्यही नाही. त्यामुळे तिच्याबद्दल येथे चर्चा करू शकत नाही. त्यामुळे तुमच्या राग येण्याच्या टिप्पणीत बदल करावा, अशी विनंतीही धनखड यांनी खरगे यांना केली.धनखड यांच्या वक्तव्यावर खरगे यांनीही मिश्किल टिप्पणी केली. ते म्हणाले की, तुम्ही रागवत नाही. राग दाखवत नाहीत. पण आतून राग राग करता. खरगे यांच्या या वक्तव्यामुळे सभागृहात पुन्हा हशा पिकला.

# जालना जिल्ह्यात रेशीम शेती क्रांती घडवून आणेल


## विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड : रेशीम शेतीची पाहणी



आधुनिक केसरी न्यूज

जालना : विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड यांनी शुक्रवारी घनसावंगी तालुक्यातील निपाणी पिंपळगाव येथे रेशीम शेतीची पाहणी केली. कमी कालावधीत शाश्वत उत्पादन देणाऱ्या रेशीम शेतीकडे जालना जिल्हयातील मोठया प्रमाणात शेतकरी वळले आहेत. रेशीम शेती जिल्हयातील शेती पध्दतीमध्ये निश्चितपणे क्रांती घडवून आणेल, असा विश्वास अर्दड यांनी व्यक्त केला. जालना जिल्हयास रेशीम कपडा निर्मिती करण्यासही चांगली संधी आहे, असेही ते म्हणाले.

जालना जिल्ह्यातील पाहणी वेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ उपस्थित होते. निपाणी पिंपळगाव येथील युवा शेतकरी सोमेश्वर डिगांबर वैद्य आणि नामदेव भीमराव माने यांच्या रेशीम शेतीची विभागीय आयुक्तांनी पाहणी करुन त्यांचे कौतुक केले. यावेळी रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते यांनी रेशीम उद्योग योजना व फायदे याविषयी माहिती दिली. सोमेश्वर वैद्य यांनी जून 2022 मध्ये 2 एकर क्षेत्रात तुती लागवड केली आहे. आक्टोबर -2022 पासुन त्यांनी रेशीम अळयांचे संगोपन करून कोष निर्मिती सुरू केली. आक्टोबर-2022 ते जुलै-2023 या नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये सोमेश्वर यांनी रेशीम किटक संगोपनाच्या एकुण 8 बॅच घेतल्या व कोष विक्रीपासून 6,56,358 इतके उत्पन्न मिळविले. तसेच मनरेगाचे माध्यमातुन त्यांना अकुशलचे 2,14,000 रुपये अनुदान अदा करण्यात आले. एकंदरीत सोमेश्वर वैद्य यांनी नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये रेशीम कोष व अनुदान मिळुन 8,70,358 रुपयाचे उत्पन्न मिळाले आहे. रेशीम शेतीतून एकूण त्यांना प्रति महा 96,706 रुपये उत्पन्न मिळाले आहे. तुती रेशीम कोष विक्रीपासून चांगले उत्पादन घेतल्याबद्दल सोमेश्वर वैद्य यांचा विभागीय आयुक्त अर्दड यांच्या हस्ते 'ऑरेंज कॅप' घालुन सन्मान करण्यात आला. तर त्यांच्या पत्नी सविता सोमेश्वर वैद्य यांचा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पाचांळ यांच्या हस्ते 'ऑरेंज कॅप' घालून सन्मान करण्यात आला. अर्दड यांनी रेशीम उत्पादक शेतकरी नामदेव भीमराव माने यांच्या रेशीम किटक संगोपन केंद्राचीही पाहणी करून माहिती घेतली. नामदेव माने यांनी सुरूवातीस 1 एकर क्षेत्रामध्ये तुती लागवड केली होती; परंतु रेशीम शेतीमधील भरघोस व शाश्वत उत्पन्न पाहुन त्यांनी आता 4 एकर क्षेत्रात तुती लागवडीचे क्षेत्र वाढविले. त्यांना प्रतिमहा रेशीम कोष विक्रीपासुन 60 ते 90 हजार रुपये उत्पन्न माने मिळाले आहे. पाहणीदरम्यान सरपंच प्रतिभा प्रदिप बिरनावळे, संभाजी देशमुख, अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपविभागीय कृषि अधिकारी सखाराम पवळ, गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम, ग्रामसेवक ज्ञानेश्वर सोनवणे, वरीष्ठ क्षेत्र सहाय्यक रेशीम एस.आर.जगताप, कंत्राटी तांत्रिक अधिकारी मनरेगा अनिरूध्द धांडे आदी उपस्थित होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'व्हय की. श्यामभाऊ आम्ही काही मोठा आजार असला तरच शहरात डॉक्टरकडे जातो. नाहीतर आम्हाला साधी गोळी बी म्हाईत नाय.'
मग सोपानकाका म्हणाले, 'चला रे मुलांनो. आमचं गाव दावतो तुम्हाला. तुमच्या शहरासारखं मोठं नाही बरं का ! बघा, आवडतं का तुम्हाला.'
श्यामराव म्हणाले, 'सोपान, अरे आम्ही पण येतो की. आपण सगळेच जाऊ.'
श्यामलाताई पण तयारच होत्या. सगळेच निघाले. गावात छोटी छोटी घरं होती. काही मातीची, काही सिमेंटची. काही घरे उंच अशा दगडी ओट्यावर होती. मुलांना मजा वाटत होती. गावाच्या एका कोपऱ्यात रामू लोहार राहत होता. एका उंच दगडी ओट्यावर त्याचे घर होते. मुले तिथे पोहोचली तेव्हा रामू कामच करीत होता. एका हाताने तिथे असलेला भाता खालीवर होत होता. त्याच्या हवेने भट्टीतील निखारे लालभडक फुलले होते. त्या भट्टीत त्याने काहीतरी लोखंडाची वस्तू ठेवली होती. ते सगळं पाहून मुलं काही काळ तिथं थबकली.
सोपानकाका म्हणाले, 'हे बघायचं का रे बाळांनो.'
पिंकी, राजेश दोघेही एकदम हो म्हणाले. शहरात त्यांना असं काही बघायला मिळत नव्हतं. पिंकीला आईने मघाशी लावलेलं गाणं आठवलं. ती म्हणाली, 'आई, आपण त्या गाण्यात पाहिलं, अगदी तसंच आहे ना इथे !' 'अगदी बरोबर आहे पिंकी. आता तू आणि राजेश बघा ते काका कसं काम करताहेत ते !' आई म्हणाली. रामुकाकांनी मग भट्टीतील ती वस्तू बाहेर काढली. ती तापून चांगलीच लाल झाली होती. रामुकाकांनी एका मोठ्या सांडशीत पकडून ती ऐरणीवर ठेवली आणि आपल्याजवळ असलेल्या मोठ्या लोखंडी घणाने ते त्यावर घाव घालू लागले. तसतसा त्या वस्तूला आकार यायला लागला. कोणीतरी आज आपल्याकडे आपलं काम बघायला आलं आहे याचा रामुकाकांना कोण आनंद झाला होता. 'पोरांनो, वाईच बसा की. समदं नीट बघा. हेच आमच्या रोजीरोटीच साधन,' 'काका, तुम्ही काय बनवताय ?' राजेशनं विचारलं. 'पोरा, आता शेतीचा हंगाम सुरु व्हईल. मंग वावरात कामासाठी निंदणीसाठी, कंपनीसाठी विळे, खुरपं लागत्यात. त्येच मी बनवतो आहे आता. शेतीसाठी, बैलगाडीसाठी लागणाऱ्या वस्तू बी बनवतो म्या.बैल, घोडे यांच्या पायामंदी नाल ठोकावी लागते. त्ये बी बनवतो. घरात लागणारी विळी, खलबत्ता, अडकित्ता आणि काय काय समदं बनवतो म्यां. पण आता आमचा धंदा लई कमी झालाय. लोकं मोठ्या गावात जाऊन वस्तू घेत्यात.'



समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## पवित्रता शोधण्याची गरज अधिक महत्त्वाची

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

संस्कृती, समुदाय, आध्यात्म किंवा धार्मिकता यांच्याशी आपला संबंध समाविष्ट केलेला असू शकतो आणि आम्ही धरत असलेल्या श्रद्धा, मूल्ये, मानसिक धारणा आणि नैतिकता समाविष्ट करू शकतो. आध्यात्मिक व्यक्ती असणे ही बाब व्यक्ती असण्याचे समानार्थी आहे, ज्याचे सर्वोच्च ध्येय स्वतःवर आणि इतरांवर प्रेम करणे आहे. आपण सर्व एक आहोत ही त्याची खात्री, त्याला सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करण्यास आणि कोणत्याही हानिकारक क्रियाकलापांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करते. जीवनाचा अर्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे. आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते. प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यतः विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या आध्यात्मिकतेत आपण स्वतः आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. आध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या

निर्मितीमध्ये आध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे.



आधुनिक केसरी

### ब्रह्मानंद रंगे | संसारात ||

नाही मार्ग सोपा | संसाराचा वेड्या ||
रिकामटेकड्या | काय गप्पा ||१||
क्षण क्षण गिळे | काळ हा जीवन ||
याचे जरा भान | ठेव गड्या ||२||
नको रे घरोबा | करू विकाराचा ||
नाश आयुष्याचा | तोच करी ||३||
धोपट मार्गाचा | पांथस्थ तू व्हावे ||
कर्मासंगे गावे | हरिनाम ||४||
पापाचा निचरा | होई संतांसंगे ||
ब्रह्मानंद रंगे | संसारात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

आज्ञया श्रीगुरोर्नित्यं त्वां
भजाम्यहमम्बिके | दारिद्र्यदुःखनाशाय
दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५८ || हे अंबिके,
श्रीगुरुंच्या आज्ञेने मी तुला नित्य भजतो.
दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा
देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पूर्ण ज्ञान के उदय में, कर्म भक्ति सब होय ।
बिना ज्ञान सब भ्रम है, धोखा जीवन सोय
।।२६।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल तृतीय अध्याय)
०४/०३/२६ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पूर्ण ज्ञान झाल्यावरच कर्म वा भक्ती
पूर्णरूपेण होत असते. ज्ञानाशिवाय जीवन
सर्व भ्रम आणि अंधकारमय आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

## मोक्षलक्षण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

अतिशय अभ्यासपूर्ण लिखाण संपूर्ण मानव जातीचं यथार्थ वर्णन, हे पिंड ते ब्रम्हांड याचा अतिशय बारीक सारीक तपशिलात जाऊन केलेली रचना अतर्क व अतिशय प्रगल्भ बुध्दी असल्या शिवाय हे समासात मांडणे केवळ अशक्य. पण समर्थानी किती साध्यासुध्या व त्याकाळच्या बोली भाषेत समास मांडले आहेत. कोटीच्या कोटी वंदन. समर्थांच्या व सन्माननीय बेलसरे सरांच्या आशिर्वाद ने हा समास पुढे रेखाटण्याचा प्रयत्न करते. काही चुकल्यास क्षणा असावी. चार देह पिंडाचे चार देह ब्रम्हांडाचे हे तर आपल्याला माहिती आहेत. ( मागच्या समासात याचे सविस्तर वर्णन केले आहे.1/7/2023 च्या लेखात ) चार देह प्रक्रुतिचे व चार देह पिंडाचे, त्यामध्ये आपण अभ्यासले की प्रक्रुति आणि पुरूष हे दोन मिळवले म्हणजे एकुण दहा होतात. परमात्मा हा सर्वाचा साक्षी आहे तो कार्य, कर्ता व कारण या सगळ्यांना वेगळेपणाने पहातो. आत्म्यावर देहाचे पांघरूण जरी आले तरी तो दृष्याचा अधीन होत नाही. त्याचे स्वातंत्र्य व निराळेपण कायम असते. पण आत्मा मुळात स्वप्रकाशमय असल्याने तो स्थूल व सुक्ष्म देहांचा प्रेरक बनतो. संपूर्ण घराचा कारभार चालवणारे वडील माणसं असतात. त्यांच्यावर संपूर्ण घराची जबाबदारी असते ते ती व्यवस्थितपणे पार पाडतात. व घरातील बाकीचे लोक जसे निश्चिंत असतात त्याप्रमाणे आत्मस्वरूपाच्या प्रकाशात ( आत्मा कर्ता नसून ) मन, बुद्धि व इंद्रिये यांचे व्यापार आपोआप चालतात. जीव आणि शिव,पिंड पिंड व ब्रम्हांडाचे विवरण कितीही केले तरी ते समजायला वेळ लागतो हे खरे. सगळ्या तत्वांहून आत्मा अगदी निराळा आहे. व त्याचे लक्षणही वेगळे आहे. आणि ब्रम्हांड, माया आणि अविद्या यांचा पसारा किंवा विस्तार अतिशय गुंतागुंतीचा व खूप मोठ्या प्रमाणात आहे. तो सांगणे हे केवळ अतर्क्य व अशक्य. या सगळ्या पसाऱ्यात आत्मा मात्र अगदी निराळा आहे तो अलिप्त आहे.

## आनंद कशामुळे मिळतो ?

आधुनिक केसरी

सृष्टी शून्यापासून निर्माण झाली. आपलीही मूळ स्थिती तीच आहे, म्हणून आपण शून्याकडे जाण्याचा प्रयत्न करावा; म्हणजेच, स्वानंदात स्वस्थ राहावे. पण ते आपल्या हातून होत नाही, कर्म करीतच राहावे असे वाटते. प्रपंचाची दगदग झाली म्हणजे आपण दूर जाऊन बसतो; पण मनाची तळमळ त्यामुळे नाहीशी झाली नाही, तर काय उपयोग ? याकरिता मनाची स्वस्थता कशाने येईल ते पाहावे. आनंद कुणाला नको आहे ? आपल्याला आनंद हवा आहे खरा, परंतु तो मिळविण्यासाठी जे करायला पाहिजे ते आपण करीत नाही. नोकरी नको आणि खायला हवे, हे कसे शक्य आहे ? खरोखर, प्रपंचाच्या या अगणित उपाधींतून सुटून जो स्वास्थ्याकडे जातो तो धन्यच होय. मनाच्या विरुद्ध गोष्टी झाल्या की लगेच आपल्या आनंदात बिघाड येतो; याकरिता, आपल्या इच्छेविरुद्ध घडले तरी माझे स्वास्थ्य बिघडणार नाही, इकडे पाहावे. याला एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे माझी इच्छाच मी नाहीशी करणे. कोणतीही वस्तू मिळावी किंवा अमुक एक गोष्ट घडावी, ही बुद्धीच ठेवू नये. जोपर्यंत हाव आहे तोपर्यंत स्वास्थ्यापासून आपण दूर आहोत असे समजावे.



महत्त्वाकांक्षा खुशाल धरावी, पण त्यामुळे मनाला त्रास होऊ देऊ नये. भगवंताची इच्छा तीच माझी इच्छा असे म्हणावे, आणि अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून जे काही होते, ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. कर्तेपणाचा अभिमान सोडल्यानेच स्वास्थ्य लाभते. मागे घडलेल्या चांगल्या-वाईट गोष्टी आठवत राहणे यामुळे आनंदात बिघाड येतो. तसेच उद्यांची काळजी करीत राहाणे यामुळेही मनाच्या स्वास्थ्यात व्यत्यय येतो. होते-जाते हे सर्व भगवंताच्या इच्छेने होते, हे मनाने पक्के ठरविल्यावर मग विनाकारण काळजी का करावी ? दुःख करणे अथवा न करणे हा मनाचा धर्म असल्यामुळे, ज्या माणसाने मनाला योग्य वळण दिले आहे, तो प्रत्यक्ष दुखणे भोगीत असताही आनंदात राहू शकेल. म्हातारपणी तर आनंद हे मोठे शक्तिवर्धक औषध आहे. ज्याला नामाचे प्रेम आले त्याला शरीराच्या कोणत्याही अवस्थेत आनंदाचा लाभ होतो; आणि ज्याला असा आनंदाचा लाभ झाला, त्याच्यावर रामाने कृपा केली असे खचित समजावे. भगवंतासाठी एकच दान खरे आहे, आणि ते म्हणजे आत्मदान होय. सतत भगवंताच्या नामात राहून देहाची विस्मृती होणे हा आत्मदानाचाच प्रकार आहे. आजचे बोधवचन आहे - २१४. वाणीने नाम घ्यावे व मनाने स्मरण करावे, आणि या दोन्हीचा मेळ असावा. श्रीराम समर्थ

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

त्यांना तुमच्याकडून काहीही अपेक्षा नसते म्हणून ते सुद्धा सद शिष्य शोधतच असतात .पण त्यांची (गुरूंची) मात्र एक अट असते ती म्हणजे त्यांच्या साठी आपल्या अन्तकरणातील बिछाना सजवलेला असावा . हा बिछाना सत्संग/सद्ग्रंथ वाचन/ सद्वर्तन यानेच सजतो. मग एकदा का स्वामी विराजमान झाले कि आपले एकच काम उरते ते म्हणजे अनैतिक कृत्ये टाळणे व सद्गुरूंचे आज्ञा पालन.या वितिरिक्त काहीही बंधन नसते कारण सद्गुरुंच्या आज्ञेतच सर्व काही बंधने असतात ती आपल्याला हितकारक अशीच असतात. सद्गुरूंची भेट होईपर्यंत मात्र आपण आपल्याकडून नामस्मरण करीत राहणे आवश्यक आहे कारण ते नामस्मरणच आपल्याला सदगुरूची भेट करवून देईल. तसे पाहता आधी संताची भेट होणे कठीण; समजा भेट झाली तरी त्याच्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण असते. म्हणून नामाचे साधन चालू ठेवावे. क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अहो दुर्जनसंसर्गान्मानहानिः पदे पदे ।
पावको लोहसंगेन मुद्गरैरभिहन्यते ॥
स्पष्टीकरण – माणूस चांगला की वाईट, सज्जन की दुर्जन, हे तो ज्याच्या संगतीत राहतो, वागतो, त्यावरून ठरत असते. दुष्टदुर्जनांच्या संगतीमुळे आपले अनेक तोटे होतात. कोणी आपला सहवास टाळतात तर कोणी आपल्यावर विश्वास ठेवीत नाहीत. त्यामुळे पदोपदी आपली कामे नडतात. तेव्हा दुर्जनसंसर्ग टाळावा हे उत्तम.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ५ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# शासकीय रुग्णालयात मोफत उपचाराच्या निर्णयाचे स्वागत : चंदुलाल बियाणी

## आरोग्य-मित्र-महाराष्ट्रचे पदाधिकारी राज्यभरात करणार जनजागृती


आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातल्या जनतेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सरकट मोफत उपचार देण्याची घोषणा करून एक क्रांतिकारक निर्णय घेतला. या क्रांतिकारक निर्णयाचे आरोग्य-मित्र-महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी स्वागत करून राज्य सरकारचे जाहीर आभार मानले आहेत. तसेच या निर्णयाची आता संपूर्ण राज्यात तंतोतंत अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे. या संदर्भात पुढे बोलताना चंदुलाल बियाणी म्हणाले की, या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाशी संलग्नित राज्यातील सर्व २ हजार ४१८ आरोग्य संस्थांचा समावेश असणार आहे. याठिकाणी पूर्वी केसपेपर काढण्यासाठी आणि नंतर उपचारासाठी रुग्णांना बराच वेळ वाट पाहत बसावे लागत होते. आता हा वेळ वाचणार आहे. उपचारासाठी आलेल्या रुग्णांना लवकरात लवकर उपचार मिळणार आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील गावपातळीवरील प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते जिल्हा रुग्णालयांपर्यंत सर्व शासकीय दवाखान्यांमध्ये सर्व उपचार व तपासण्या सरसकट मोफत केल्या जाणार आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव पूर्ण करत असताना महाराष्ट्र शासनाने राज्यातील जनतेच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने तसेच Out of Pocket Expenditure शून्य करण्याच्या दृष्टीने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 15 ऑगस्टपासून या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तशा स्पष्ट सूचना सर्व आरोग्य यंत्रणेला दिल्या आहेत. महाराष्ट्रातील जनतेला दर्जेदार चांगले व निरोगी जीवन जगण्यासाठी या निर्णयाचा मोठा फायदा होणार आहे. या क्रांतिकारी निर्णयामुळे यापुढे महाराष्ट्रातील जनतेला सर्व तपासण्या, रक्त चाचण्या, सर्व डायग्नोस्टिक सेवा अगदी मोफत मिळणार आहेत. यासाठी आरोग्य-मित्र-महाराष्ट्रचे पदाधिकारी राज्यभरात जनजागृती करतील, असा विश्वास शेवटी चंदुलाल बियाणी यांनी व्यक्त केला आहे.

# जालन्यात ना. धों. महानोर श्रद्धांजली सभा आज

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** पद्मश्री कवी ना. धों. महानोर यांचे 3 ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले. जालना व परिसरात त्यांचे सातत्याने साहित्यिक उपक्रमांच्या निमित्ताने येणे होते. त्यामुळे साहित्यिक, रसिक, शेतकरी यांच्याशी त्यांचा एक ऋणानुबंध तयार झालेला आहे. मराठवाडा साहित्य परिषद शाखा जालनाच्या वतीने आज 5 ऑगस्ट रोजी त्यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन विठ्ठल-रुक्मिणी सभागृह, यशवंतनगर, अंबड रोड, जालना येथे सायंकाळी 5 वाजता करण्यात आले आहे. या सभेस शहरातील सर्व काव्यरसिकांनी व साहित्यिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन मराठवाडा साहित्य परिषद, शाखा जालना च्या वतीने अध्यक्ष प्रा. रमेश भुतेकर व सचिव पंडित तडेगावकर यांनी केले आहे.

# भर पावसात एस.डी.ओ. कार्यालयावर धडकला वंचितचा आक्रोश मोर्चा



आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** ४ ऑगस्ट रोजी वंचित बहूजन आघाडीच्या वतीने तालुका अध्यक्ष संतोष गवई सर यांच्या नेतृत्वात पुरग्रस्त जनतेच्या विविध मांगण्यासाठी जळगाव जामोद येथे आक्रोष मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

२२ जुलै रोजी सातपुड्याच्या डोंगरात ढगफुटी होवून जळगाव शहरासह संपुर्ण तालुक्यातील लहान मोठ्या नदीनाल्यांना महापूर येवून अनेक गावातील लोकांचे पुरामुळे प्रचंड नुकसान झाले. घरादारासह, गुरेढोरे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.पण शासण प्रशासणाकडून पूरग्रस्तांना वेळेवर कुठलीच मदत मिळाली नाही. महसूल आणि नगर पालीका प्रशासनाने पुरग्रस्तांना अक्षरशः वाऱ्यावर सोडलं.बहुतांश गावातील अनेक कुटुंबाला याचा मोठा फटका बसला.त्यामुळे तालुक्यातील पूरग्रस्थांनमध्ये शासन प्रशासनाबद्दल मोठ्या प्रमाणावर असंतोष खदखदत होता.तोच धागा पकडत समाजातील वंचित घटकांच्या मागण्यासाठी सदैव खंबिरपणे लढणाऱ्या वंचित बहूजन आघाडीने प्रशासणाला धारेवर धरत पूरग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी जळगाव जामोद येथे भिमनगर ते एस.डी.ओ.कार्यालयाप्रयंत आक्रोष मोर्चाचे आयोजन केले होते. भिमनगर येथून मोर्चाला सुरवात होवून एस.डी.ओ.कार्यालयासमोर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. मोर्चामध्ये तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर जणता सहभागी झाली होती. पूरग्रस्तांना संबोधित करतांना श्रिकृष्ण गवई, देवाभाऊ दामोदर, वंदनाताई भगत, साहेबराव भगत, प्रभात पाटील, यासरख्या वंचीतच्या युवा नेत्यांनी पूरग्रस्थांच्या व्यथा व्यक्त करतांना त्यांचा आक्रोष प्रशासन आणि लोकप्रतीनीधींच्या उरात धडकी भरविणारा होता. मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. येत्या चार दिवसात जर मोबदला मिळाला नाही तर तालुक्यातील पूरग्रस्त जणता अधिकाऱ्याच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा देण्यात आला. शरदभाऊ वसतकार यांनी सुद्धा मार्गदर्शन करताना सांगितले की, पूरग्रस्थ जनतेला दिलासा देने शासनाचे काम असून लोकांनी बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी उभे रहावे. सदर मोर्चात नादुरा तालुका अध्यक्ष अजाबराव वाघोदे, इंगळे साहेब, सुभाष शिरसाट, मोहीत दामोधर, तुकाराम रोकडे, सुगदेव वानखडे, रामकृष्ण तायडे, रवी नाईक, मधुकर भगत, रमेश नाईक, विजय तायडे, ॲड. ब्राम्हणे, सुषमाताई हिवराळे, जगदिश हातेकर, स्वप्नील गवई, रामभाऊ तायडे, अताउल्ला खान, महादेव बगाडे, सुनिल इंगळे, प्रमोद कोकाटे, बुद्धभूषण अर्दळे, गणेश तायडे, शरद तायडे, आशिष धुंदाळे, दिलीप तायडे, भिमराव हेलोडे, मुजीब खान, राज वाकोडे, इ.कार्यकर्ते व पदाधिकारी हजर होते.



# बल्लारपूर येथे मंडल यात्रेचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** मंडल दिनाच्या औचित्य साधून ओबीसी, व्हिजेनटी, एसबीसी जनजागृती अभियाना अतर्गत विदर्भात सात जिल्ह्यात मंडल यात्रेला सुरुवात झाली. ओबीसींच्या विविध मागण्या व जनजागृती साठी नागपूरहून निघालेली मंडल यात्रा दिनांक 3 ऑगस्ट रोजी कळमना, बामणी मार्गे बाल्लरपुर येथे दाखल झाली. कळमना येथे सतीश बावणे, झाडे अमीत नळेतसेच बामणी येथे यात्रेचे स्वागत सरपंच प्रल्हाद आलम, उपसरपंच सुभाष भाऊ ताजणे, राजेश भट्टे, गणपती भाऊ मोरे यांनी स्वागत केले. ओबीसी समन्वय समिती पदाधिकारी तसेच ज्येष्ठ समाजसेविका डॉक्टर रजनीताई हजारे, चेतन गेडाम, एडवोकेट प्रणय काकडे, नागेश रत्नपारखी, अनिल वागदरकर प्रभाकरजी मुरकुटे यांनी मंडल यात्रेचे स्वागत केले. यानंतर बल्लारपूर येथे बाईक रॅली काढण्यात आली. जय भीम बहुउद्देशीय संस्थाचे अध्यक्ष संतोष बेताल देवरावजी मेश्राम, कवाडे काकाजी त्यांच्याद्वारे स्वागत करण्यात आले. रमाबाई चौक आम आदमी पार्टीचे शहरअध्यक्ष रवी कुमार पुप्पुलवार, अफजल अल्ली, ज्योती बापरे यांनी यात्रेचे स्वागत केले. त्यानंतर मंडल यात्रेचा स्वागत समारोह शासकीय विश्रामगृहात झाला. स्वागत सभेचे अध्यक्ष सूर्यकांत साळवे, प्रमुख पाहुणे अंजलीताई साळवे, उमेश कोराम, ऍड पुरुषोत्तम सातपुते, प्रा.अनिल डहाके होते. ओबीसी जनगणना ही केंद्र सरकारची जवाबदारी आहे परंतु केंद्र जर ओबीसी जनगणना करत नसेल तर ती राज्याने करावी.कारण ओबीसीचा आकडाच जर सरकार जवळ नाही तर ओबीसीच्या कल्याण करी योजना, ओबीसी आरक्षण असे मुद्दे सरकार कोणत्या आधारावर हाताळत आहे हा प्रश्न पडतो, असे मत लढा ओबीसी जनगणना व पाटी लावा अभियानाच्या प्रणेत्या डॉ. ऍड. अंजली साळवे यांनी सभेत व्यक्त केले. ओबीसी विद्यार्थ्यांना स्वाधार योजना सुरू झाल्या पाहिजे, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना शंभर टक्के फी माफी, महाज्योत संस्थेला 1000 कोटी रुपयांची निधी ,इतर मागास आर्थिक विकास मंडळाला1000 कोटी रुपयाचा निधी तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाद्वारे सर्व जिल्ह्यात स्वतंत्र कार्यालय ओबीसी वसतिगृह अश्या अनेक मागण्या व जनजागृतीसाठी ही यात्रा असून मंडल यात्रा टप्प्या टप्प्याने विदर्भातील जिल्हे तालुके फिरणार आहे असे मत मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोराम यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश कडू यांनी तरआभार प्रदर्शन ओबीसी समन्वय समितीचे अध्यक्ष विवेक खुटेमाटे यांनी केले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सुधीर कोरडे, शंकर काळे, अमोल काकडे, रणजीत धोटे, अंकित निवलकर, चंद्रशेखर भेडारकर असंख्य ओबीसी बांधव व सामाजिक संघटना सहभाग लागला.



# न्यायामूर्तींचा राजीनामा

आधुनिक केसरी

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायामूर्ती रोहित देव यांनी भर कोर्टातच राजीनामा दिला आहे. देव यांनी कोर्टातच राजीनामा दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे रोहित देव यांच्या निवृत्तीला एक वर्ष बाकी होते. त्यापूर्वीच त्यांनी कोर्टात राजीनामा देत असल्याचं जाहीर केले. त्यांची ही घोषणा ऐकून उपस्थित वकील आणि कोर्टाचे कर्मचारीही अवाक झाले होते. त्यानंतर कोर्ट परिसरात केवळ देव यांच्या राजीनाम्याचीच चर्चा सुरू होती. सकाळी कोर्ट सुरू झाल्यानंतर न्यायामूर्ती रोहित देव यांनी कोर्टाचे कामकाज पाहिले. सर्वा कामकाज नियमितपणे हाताळल्यानंतर त्यांनी कोर्ट रूममध्येच न्यायामूर्तीपदाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले. आणि काही न बोलता ते कोर्टातून निघून गेले. देव यांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्काच बसला. यावेळी त्यांनी सर्वांकडे दिलगिरीही व्यक्त केली. मी उपस्थितांची दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या वागण्यामुळे कुणाचे मन दुखावले असेल तर मी दिलगीर आहे. मी आज माझ्या पदाचा राजीनामा देत आहे. सेवेतून मुक्त होत आहे, असे रोहित देव यांनी राजीनामा देताना सांगितले. वकिलांनी कठोर मेहनत करत राहावी, असा सल्ला देतानाच काही प्रसंगी मी तुमच्यासोबत कठोर वागलो, त्याबद्दल दिलगीर आहे, असंही ते म्हणाले. मी प्रत्येकाचीच माफी मागतो. इथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाची. कधी कधी मी तुमच्यावर ओरडलो. त्यामागचे कारण म्हणजे तुमच्यात सुधारणा व्हावी. तुम्हाला दुखावण्याचा माझा हेतू नव्हता. कारण तुम्ही मला कुटुंबासारखे आहात. पण तुम्हाला सांगायला खेद वाटतो की मा राजीनामा देत आहे. माझ्या आत्मसन्मानाच्या विरोधात मी काम करू शकत नाही, असेही त्यांनी म्हटले. न्यायामूर्ती रोहित देव यांनी नक्षलवाद्यांशी संबंध असलेले प्रा. जीएन साईबाबा यांना निर्दोष मुक्त केले होते. त्यांच्या या निर्णयानंतर राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने नागपूर खंडपीठाचा निर्णय फिरवून साईबाबा यांना दोषी ठरवलें होते. देव यांच्या राजीनाम्या मागे हेही एक कनेक्शन असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, देव किंवा इतर कुणीही त्यांच्या राजीनाम्याचे नेमके कारण सांगितलेलं नाही. विशेष म्हणजे देव यांच्या निवृत्तीला एक वर्ष बाकी असताना त्यांनी असा तडकाफडकी निर्णय कसा घेतला? याचचे आश्चर्य सर्वांना वाटत आहे. न्यायामूर्ती देव यांची मुंबई हायकोर्टात 5 जून 2017 रोजी ॲडिशनल जज म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर 12 एप्रिल 2019मध्ये त्यांची जज म्हणून कायमस्वरुपी नियुक्ती झाली होती. ते 4 डिसेंबर 2025मध्ये निवृत्त होणार होते.

# धर्मनिरपेक्ष देशात समान नागरी संहिता का नाही ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**देश धार्मिक दृष्ट्या एक असताना सर्वांसाठी समान कायदा का नाही? वास्तविक, समान नागरी संहिता म्हणजेच समान नागरी संहिता आजतागायत बहाल करण्यात आलेली नाही आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ते देशासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. धर्मग्रंथ, चालीरीती आणि देशातील प्रमुख धार्मिक समुदायांच्या श्रद्धा यांच्या आधारे बनवलेल्या वैयक्तिक कायद्यांच्या जागी, भारतातील सर्व नागरिकांसाठी एकसमान संहिता बनविण्याला समान नागरी संहिता म्हणतात. देशात अनेकवेळा मागणी करण्यात आली, मात्र व्होटबँकेमुळे समान नागरी संहितेचे प्रकरण मागे पडत राहिले. नागरिकांच्या राहणीमानात सर्वसमावेशक आणि एकसमान सुधारणा व्हावी यासाठी हा कायदा आणण्याची आज गरज आहे.**



भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून, भारतीय संविधानाने भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखले. पण गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न पुन्हा पुन्हा समोर येत आहे की जर भारतात खरोखरच धर्मनिरपेक्षता आहे तर समान नागरी कायदा का नाही ? वेगवेगळ्या धर्मांना वैयक्तिक कायदे का आहेत ? भारतात समान नागरी संहिता नाही, तर धर्माच्या आधारावर कायदे ठरवले गेले आहेत. मुस्लिमांसाठी शरियावर आधारित कायदे आहेत तर हिंदू, शीख, जैन आणि बौद्धांसाठी स्वतंत्र वैयक्तिक कायदे आहेत. जरी मुस्लिम वगळता इतर धार्मिक समुदायांचे कायदे भारतीय संसदेच्या संविधानावर आधारित आहेत. पण असे असले तरी धर्मनिरपेक्षता इतर सर्वच क्षेत्रात लागू असताना कायद्यात का नाही, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

जगातील बहुतेक लोकशाही देशांमध्ये समान नागरी संहिता लागू आहेत. अमेरिका, आयर्लंड, इंडोनेशिया, पाकिस्तान, बांगलादेश, मलेशिया, तुर्की, सुदान आणि इजिप्त यांसारख्या अनेक देशांनी समान नागरी संहिता लागू केली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की यापैकी बरेच देश धर्मनिरपेक्ष किंवा धर्मनिरपेक्ष नाहीत, तरीही त्यांनी समान नागरी संहिता लागू केली आहे, ज्यामध्ये वैयक्तिक आणि मालमत्तेसह विविध कायद्यांचा समावेश आहे.

समान नागरी संहिता किंवा एकसमान नागरी संहिता म्हणजे धर्मनिरपेक्ष कायदा जो सर्व पंथांच्या किंवा धर्माच्या लोकांना समान रीतीने लागू होतो. सोप्या शब्दात समजून घेण्याचा प्रयत्न केला तर वेगवेगळ्या पंथांसाठी वेगवेगळ्या धर्मावर आधारित कायदे नसणे म्हणजे 'समान नागरी संहिता' होय. ही संहिता कोणत्याही देशाच्या एकूण स्वरूपाला बळ देते आणि कायद्याच्या नावाखाली देश विभागलेला दिसत नाही.

धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतासारख्या देशाकडून येथे समान नागरी कायदा लागू व्हावा, जेणेकरून प्रत्येक नागरिकाला कोणताही भेदभाव न करता समान कायदेशीर हक्क मिळावेत, अशी अपेक्षा करणे चुकीचे नाही. मात्र भारतात स्वातंत्र्यापूर्वीच कायद्याबाबत फाळणी झाली आहे.


खरे तर इंग्रजांना त्यांच्या धर्मावर आधारित वैयक्तिक कायदे बदलून मुस्लिम समाजाशी कोणत्याही प्रकारचे वैर नको होते. त्यानंतर अनेकवेळा समान संहितेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला, मात्र विविध राजकीय कारणांमुळे तो दडपला गेला. मुस्लिम घटस्फोट आणि विवाह कायदा ब्रिटिश काळातच लागू झाला. आणि तेव्हापासून ते कायम आहे. 1993 मध्ये महिलांवरील भेदभाव दूर करण्यासाठी केलेल्या कायद्यात जुन्या कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आली. मात्र या कायद्यामुळे मुस्लिम आणि सरकार यांच्यातील दरी अधिक खोलवर गेली. काही मुस्लिमांनी या बदलाला विरोध केला कारण त्यांचे सर्व कायदे शरियावर आधारित असावेत असा त्यांचा विश्वास होता.

भारतीय राज्यघटनेच्या भाग 4 च्या कलम 44 मध्ये समान नागरी संहितेचा उल्लेख आहे. समान नागरी कायदा लागू करणे हे आमचे ध्येय असेल, असे धोरणात्मक निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही अनेकवेळा समान नागरी संहिता लागू करण्याच्या दिशेने केंद्र सरकारचे मत जाणून घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

स्वातंत्र्यानंतरही समान नागरी संहिता लागू होऊ शकली नाही. तुष्टीकरणाच्या पटलावरही नवीन तुकडे आणले गेले. उदाहरणार्थ, 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द समाविष्ट करण्यात आला. त्याचा सकारात्मक हेतू बघितला तर भारतीय राज्यघटनेला भारतातील सर्व नागरिकांसोबत धर्माच्या आधारे कोणताही भेदभाव संपवायचा आहे, हे समजते, पण मग समान नागरी संहितेसाठी प्रयत्न का झाले नाहीत, हा यक्ष आहे. प्रश्न आणि हेच कारण आहे.घटनेत धर्मनिरपेक्षता जोडणे ही राजकीय मंडळाची चाल होती असे मानले जाते. संविधानाने दिलेल्या भारतीय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांमध्ये 'कायद्याचे राज्य' असे सांगितले आहे, त्यानुसार सर्व नागरिकांसाठी समान कायदा असावा. पण स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही त्याचा अभाव भारतात दिसून येतो. एकसमान नागरी संहितेचा सर्वसमावेशक अभ्यास करण्यासाठी कायदा आणि न्याय मंत्रालयाने 2016 मध्ये कायदा आयोगाची स्थापना केली होती. विधी आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की समान नागरी संहितेच्या मुद्द्यावर मूलभूत हक्कांच्या कलम 14 आणि 25 मधील संघर्षाचा परिणाम होतो. महिला आणि मुलांच्या मुलभूत हक्कांना प्राधान्य देणे आणि त्यांचा आदर करणे ही प्रत्येक सरकारची जबाबदारी असली पाहिजे, असेही विधी आयोगाने म्हटले आहे. त्यामुळेच सर्व खासगी कायदेशीर प्रक्रिया एकाच कोडखाली आणण्याची गरज आहे. लग्नाचे किमान वय असो किंवा घटस्फोट घेण्याचा अधिकार असो किंवा दत्तक घेण्याशी संबंधित अधिकार असो किंवा मालमत्तेशी संबंधित अधिकार असो, समान नागरी संहिता नक्कीच आशेचा किरण दिसते. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा तिन्ही पातळ्यांवर समान नागरी संहिता आवश्यक आहे, जेणेकरून कोणत्याही प्रकारचे पूर्वग्रह आणि सामाजिक दुष्कृत्ये दूर करून भारताला खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष देश म्हणून जागतिक स्तरावर ओळखता येईल.

धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतासारख्या देशाकडून येथे समान नागरी कायदा लागू व्हावा, जेणेकरून प्रत्येक नागरिकाला कोणताही भेदभाव न करता समान कायदेशीर हक्क मिळावेत, अशी अपेक्षा करणे चुकीचे नाही. मात्र भारतात स्वातंत्र्यापूर्वीच कायद्याबाबत फाळणी झाली आहे. समान नागरी संहितेबाबत केंद्रीय स्तरावर सक्रियता वाढली असताना, तेव्हा सरकारने या मुद्द्यावर सर्व धर्म, सामाजिक आणि आदिवासी गटांच्या प्रतिनिधींचा सल्ला घेणे आणि त्यांना विश्वासात घेऊन पुढील पावले उचलणे अत्यंत आवश्यक झाले आहे. हे देखील आवश्यक आहे कारण हा मुद्दा अल्पसंख्याकांचा छळ किंवा दडपशाहीशी संबंधित नाही किंवा हा बहुसंख्याक विरुद्ध अल्पसंख्याक असा मुद्दा नाही. अल्पसंख्याक समाज किंवा आदिवासी समाजाला केवळ त्रास देण्यासाठी किंवा राजकीय फायदा घेण्यासाठी यूसीसी लागू केली जात असल्याची भावना त्यांना येऊ नये ही सरकारची जबाबदारी आहे. लादण्याच्या भावनेपेक्षा एकमत निर्माण करण्याच्या प्रयत्नावर भर देण्याची गरज आहे.

# महाराष्ट्राला समृद्ध करणारे कलावंत हरपले



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**बुधवार आणि गुरुवार असे सलग दोन दिवस महाराष्ट्रासाठी घातवार ठरले कारण बुधवार आणि गुरुवार या दोन्ही दिवशी मराठी मातीला आणि महाराष्ट्राला आपल्या उत्तुंग कलाकृतीने वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या दोन महान कलावंताचे निधन झाले. बुधवारची सकाळ उजाडताच महाराष्ट्राला धक्कादायक बातमी समजली ती म्हणजे आधुनिक युगाचा विश्वकर्मा अशी ओळख असलेला सिनेसृष्टीतील प्रख्यात कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांच्या आकस्मिक निधनाची. नितीन देसाई यांनी त्यांच्या एन. डी स्टुडिओमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बातमीने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला कारण त्यांच्यासारखा लढवय्या कलाकार असे टोकाचे पाऊल उचलेल असे कोणालाही वाटले नाही.**

. नितीन देसाई कला क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व. सर्वसामान्य मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्मलेल्या नितीन देसाई यांचा प्रवास तसा थक्क करणारा. एका मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्म घेऊन बॉलिवूड मध्ये स्वतःच वेगळं स्थान निर्माण करणारा हा उमदा कलाकार नवोदित कलाकारांसाठी नेहमीच प्रेरणास्त्रोत राहिला आहे. हिंदी चित्रपटात जे भव्यदिव्य सेट आपण पाहतो त्या सेटची निर्मिती हेच नितीन देसाई करायचे. नितीन देसाई यांचे चित्रपटातील भव्यदिव्य सेट पाहून हे सेट मराठी माणसाने उभारले असतील यावर विश्वासच बसत नसे. हम दिल दे चुके सनम, देवदास, मुन्नाभाई एमबीबीएस, १९४२ ए लव्ह स्टोरी, परींदा, प्रेम रतन धन पायो, ट्राफिक सिग्नल, फॅशन, जोधा अकबर, मंगल पांडे, डिस्कव्हरी ऑफ इंडिया, बालगंधर्व, केबीसी, बिगबॉस, चाणक्य तमस, जंगल बुक, डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यासारखे चित्रपट आणि मालिकांचे सेट नितीन देसाई यांनीच उभारले होते इतकेच नाही दिल्लीत होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या महाराष्ट्राच्या चित्र रथाची निर्मितीही त्यांनी अनेकदा केली. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. कलाकार म्हणून ते श्रेष्ठ होतेच पण माणूस म्हणूनही ते तितकेच श्रेष्ठ होते त्यांनी अनेक तरुण कलाकारांना मोठे केले. खरं तर त्यांचं काम खूप मोठं आहे. शंभरहून अधिक चित्रपट, मराठी, हिंदी मालिका, स्टेज शो, असंख्य जाहिराती अशी त्यांच्या कामाची यादी वाढतच जाणारी आहे म्हणूनच त्यांच्याविषयी मराठी माणसाच्या मनात एक आदराची भावना होती त्यामुळेच त्यांचे असे आकस्मिक निधन मराठी माणसांसाठी धक्कादायक होते. त्यांच्या निधनाच्या धक्क्यातून महाराष्ट्र सावरत नाही तोच गुरुवारी मराठी साहित्यातील अनमोल रत्न , निसर्ग कवी ना. धो. महानोर यांच्या निधनाची बातमी आली.

नितीन देसाई यांचे निधन महाराष्ट्रासाठी जितके धक्कादायक ठरले तितकेच महानोर यांचे निधन चटका लावून जाणारे ठरले. मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी महानोर सरांनी जे योगदान दिले ते सुवर्ण अक्षराने नोंदवले जाणार आहे. ना. धो महानोर हे निसर्ग कवी आहे. शेत शिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतूनही निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अदभुत निसर्ग कवितांनी त्यातल्या रंग गंधानी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद - लईंनी वाचक रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या महानोर सरांच्या कवितेचं केंद्रस्थान होते ते निसर्ग आणि स्त्रिया. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. त्यांची एकूण अकरा कविता संग्रह प्रसिद्ध असून अजिंठा नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. वही आणि पळसखेडची गाणी हे त्यांचे लोकगीतांचे संग्रह आहेत. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणी देखील लिहिली आहेत. जैत रे जैत चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठावर आजही कायम आहेत. महानोर सर सहा वर्ष विधानपरिषदेचे सदस्य होते या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केले. महानोर सरांनाही अनेक पुरस्कार मिळाले अगदी पद्मश्री देखील मिळाली मात्र निसर्ग कवी ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. रसिकांच्या आणि वाचकांच्या मनातही ते कायम निसर्ग कवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. नितीन देसाई आणि ना. धो. महानोर या श्रेष्ठ कलाकारांनी आपल्या कलेतून महाराष्ट्राचे नाव वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. या दोन्ही महान कलाकारांच्या जाण्याने महाराष्ट्राचे आणि कला सृष्टीची मोठी हानी झाली आहे. या दोन्ही महान कलाकारांना भावपूर्ण श्रद्धांजली!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राज्यातील चौदा कोटी जनतेच्या हितासाठी काम करणार

## विरोधी पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सध्या राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. गेल्या दोन दिवसांपूर्वी विरोधी बाकावरील काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांच्या नावाचे विरोधी पक्षनेते पदी निवडी संदर्भातील पत्र विधानसभा अध्यक्ष यांचेकडे देण्यात आले होते. आज सभागृहात विजय वडेट्टीवार यांच्या नावाची विधानसभा अध्यक्षाकडून विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्तीची घोषणा करण्यात आली. सभागृहात घोषणा होताच अतिशय सामान्य कुटुंबातील व्यक्ती पक्षातील एक सामान्य कार्यकर्ता ते वन विकास महामंडळ अध्यक्ष, आमदार, राज्यमंत्री व सलग दोनदा राज्याचे विरोधी पक्ष नेते असा यशस्वी प्रवास गाठणाऱ्या नवनियुक्त विरोधी पक्ष नेते विजय



वडेट्टीवार यांचे पक्ष सहकारी व सत्ताधाऱ्यांकडून कौतुकांचा वर्षाव करीत अभिनंदन करण्यात आले. तर राज्यातील 14 कोटी जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असे प्रतिपादन करून नवनियुक्त विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सर्वांचे आभार मानले. विधिमंडळात विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती झाल्यानंतर सभागृहात बोलताना विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सलग दोनदा सरपंच असलेले माझे वडील यांच्या निधनाने कुटुंबावर बेताची परिस्थिती ओढवली. अशा हलाखीच्या परिस्थितीत राज्यातील अतिदुर्गम ,आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली येथे कुटुंबाचे स्थलांतर झाले. यावेळी कुटुंबाच्या उदरनिर्वाह करिता काही काळ तेंदू पत्ता संकलनाचे काम देखील करावे लागले. शिवसेना पक्षात प्रवेशानंतर गडचिरोली सारख्या दुर्गम जिल्ह्यात 550 शाखा उघडून युवकांना रोजगारासाठी प्रेरित करीत असताना चक्क नक्षल्यांचाही सामना करावा लागला. यादरम्यान नक्षलवाद्यांशी झालेली भेट या अविस्मरणीय प्रसंगाचा विशेष करून त्यांनी यावेळी उल्लेख केला. विरोधी पक्षनेता म्हणून दुसऱ्यांदा मिळालेली ही संधी गोरगरीब जनसामान्य यांच्या वेदनांवर फुंकर घालण्यासाठी असून राज्यातील कष्टकरी, शेतकरी, दिन दुबळे, ओबीसी, दलित, आदिवासी व सर्वसामान्य नागरिकांचा आवाज विधानसभेपर्यंत पोहोचविण्यासाठी मिळालेली संधी होय असेही ते यावेळी म्हणाले. तर राष्ट्रपितांवर झालेल्या टीका टिप्पणीचा समाचार घेत विरोधी पक्ष नेते वडेट्टीवार यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देशासाठी दिलेले योगदान याचे महत्त्व पटवून देणारी उदाहरण देत गांधीजींच्या महानते बाबत व देशासाठी दिलेल्या बलिदानाची माहिती देउन जीवनावर प्रकाश टाकला. तद्वतच विदर्भाचे नामवंत कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेच्या ओळी, व शेरेबाजी करीत प्रखर शैलीची चुणूक दाखविली. सोबतच सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ 200 हून अधिक असताना विरोधी भूमिका वठविण्यासाठी केवळ सामर्थ्य आणि प्रामाणिकता हवी असल्याचे सूतोवाच करीत सरकारने विपक्षांना देशाच्या संविधानात्मक अधिकारातून विश्वासात घेऊन राज्य विकाससाठी प्रयत्नशील राहावे. अशी मागणी वजा इशारा ही त्यांनी यावेळी दिला.

**वडेट्टीवार हे नेतृत्वच वेगळे : अजित पवार**

आपला होमपीज असलेला मतदार संघ सोडून इतरत्र निवडणूक लढण्यास कुणीही तयार होत नाही . मात्र नवनीत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार हे एकमेव व्यक्ती आहेत की त्यांनी सलग दोन मतदारसंघातून निवडणूक लढवून विजयश्री खेचून आणली . त्यांच्या दांडगा जनसंपर्क व लोकोपयोगी कामांसाठी धडपड आत्या यशाचा मूलमंत्र असल्याचे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर कौतुकांचा वर्षाव केला .

## ‘महाडीबीटी’ मार्फत मिळणारा लाभ नाकारता येण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करुन देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य शासनामार्फत विविध योजनांच्या लाभार्थ्यांना ‘महाडीबीटी’ पोर्टलमार्फत अनुदानाचे थेट हस्तांतरण करण्यात येते. मात्र एकदा मिळालेले अनुदान परत करण्यासंदर्भात व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे ज्यांना अनुदानाची आवश्यकता नाही त्यांना ते नाकारता येण्यासाठी दोन महिन्यात व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानपरिषदेत या प्रश्नी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘एलपीजी’ सिलेंडरचे अनुदान नाकारण्यासाठी ‘पहल’ सुविधा निर्माण केली होती. या अंतर्गत अनुदानाची आवश्यकता नसणाऱ्या महाराष्ट्रातील १६ लाख ५२ हजार लाभार्थ्यांनी आपले अनुदान नाकारले. या योजनेचे सर्वत्र कौतुक झाले. यामुळे एक वेगळा, चांगला पायंडा पडला. या योजनेत नाकारलेले अनुदान इतर गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना मिळू शकते. राज्य शासनामार्फत विविध योजनांचे अनुदान ‘महाडीबीटी’ पोर्टलच्या माध्यमातून दिले जाते. मात्र ज्यांना अनुदानाची आवश्यकता नाही त्यांना अनुदान नाकारण्यासाठी कोणतीही व्यवस्था पोर्टलमध्ये नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन वित्त विभाग व माहिती तंत्रज्ञान विभागाशी समन्वय साधून अनुदान नाकारण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. ही प्रक्रिया जलद गतीने राबवून येत्या दोन महिन्यात सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.




## रानटी जनावरांचा बंदोबस्त करण्याची काँग्रेस पक्षाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** दि.3ऑगस्ट 2023 रोजी जिंतूर तालुक्यातील विविध गावामध्ये रानटी जनावरे शेतकऱ्याच्या पिकांचे मोठे नुकसान करीत आहेत. त्या जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी तहसीलदार यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. सदर निवेदन स्वीकारत तहसीलदार जिंतूर यांनी सांगितले की, पुढील आठवड्यात वन विभागाचे अधिकारी, गटविकास अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी, काँगेस पक्षाचे पदधिकारी व शेतकरी यांची संयुक्त बैठक बोलवून यावर तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन दिले या प्रसंगी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष नानासाहेब राऊत,माजी नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, काँग्रेस तालुका अध्यक्ष गणेशराव काजळे,तालुका संघटक इर्शाद पाशा चांद पाशा, युवक विधानसभा उपाध्यक्ष सुलेमान सिद्दीकी, तहसीन देशमुख, संदीप देशमुख,शिवाजी लीपणे,विठ्ठल थोरवे,नारायण काकड,योगेश कंठाळे, ज्ञानदेव आंधळे,गणेश थोरवे,भिकाजी काकड,संभाजी काकड,नितीन जाट,भगवान आंधळे, गजानन आंधळे, या सह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व अनेक शेतकरी उपस्थित होते.



## समीरभाऊ दुधगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त गणवेश, शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात समीर भाऊ दुधगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. परभणी जिल्ह्याचा विकास गतिमान व्हावा आणि येणाऱ्या काळात युवकांच्या हाताला काम देऊन बेकारी कमी करण्याचे आव्हान पेलवणारं उच्चशिक्षित, सक्षम असं नेतृत्व शोधून आगामी निवडणुकांमध्ये त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात तरच तरुणाईचा भविष्यकाळ उज्वल असेल असे प्रतिपादन भाजपचे ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष समीर भाऊ दुधगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे होते. तर व्यासपीठावर समीर भाऊ दुधगावकर, ॲड. माधव दाभाडे, प्राचार्य एम. एस. दाभाडे, सोपानराव भिसे, प्रकाश लांडगे, डॉ. शाम गोरे उपस्थित होते. पुढे समीर भाऊ दुधगावकर म्हणाले की विद्यार्थ्यांनी श्रमाची लाज बाळगू नये. मिळेल ते काम मन लावून करावे. अनेक माणसं महाविद्यालयात शिकताना ' ' कमवा आणि शिका ' सारख्या योजनेत काम करून मोठी झालेली आहेत. याच कार्यक्रमात महाविद्यालयातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करून समीर भाऊ दुधगावकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. प्रा डॉ श्यामा गोरे यांनी संकलित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशनही या कार्यक्रमात करण्यात आले. कार्यक्रमास अड. बबनराव घुगे, बंडू लांडगे , सिद्दिकी, सय्यद नावीद यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि संचालन प्रा.डॉ. पंढरीनाथ धोंडगे यांनी केले तर आभार प्रा. पांडुरंग निळे यांनी मानले.

महाराष्ट्र Business Katta












# कौशल्य विकासानेच कमी होईल गरिबी, बेरोजगारी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कौशल्य विकास श्रमाला स्पर्धात्मक आणि अधिक उत्पादक बनवून संरचनात्मक बदलाद्वारे सामाजिक-आर्थिक विकासास हातभार लावतो. हे केवळ उत्पादकता वाढवून अधिकाधिक चांगल्या नोकऱ्या निर्माण करत नाही तर लोकांचे जीवनमान सुधारते. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या अजूनही पारंपारिक उपजीविकेच्या साधनांद्वारा जीवन जगत आहे. देशातील निम्मी कामगार शक्ती ग्रामीण रोजगारात आहे आणि नव्वद टक्क्यांहून अधिक कामगार असंघटित क्षेत्रात आहेत, ज्यांची उत्पादकता कमी आहे. अशा परिस्थितीत गरीबी आणि बेरोजगारीसह देशातील अनेक सामाजिक-आर्थिक समस्यांच्या संदर्भात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि कौशल्य विकास समजून घेण्याची गरज आहे.**

भारतातील सुमारे दोन तृतीयांश लोकसंख्या 15 ते 59 वर्षे वयोगटातील आहे आणि 54 टक्के लोकसंख्या 25 वर्षांपेक्षा कमी आहे. 'स्किल इंडिया रिपोर्ट 2018' नुसार, भारताच्या लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे मुख्य कारण म्हणजे पुढील सहा वर्षे लोकसंख्येचे सरासरी वय 29 वर्षांपेक्षा कमी राहील. 2019 च्या युनिसेफच्या अहवालानुसार, 2030 पर्यंत, सुमारे 47 टक्के भारतीय तरुणांकडे रोजगारासाठी आवश्यक शिक्षण आणि कौशल्याची कमतरता असेल, ज्यामुळे रोजगारावर परिणाम होईल. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचा अंदाज आहे की 2030 पर्यंत कौशल्यांमध्ये सुमारे 30 दशलक्ष अंतर असेल, ज्यामुळे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नावर परिणाम होईल. पुढील काही वर्षांत कामगार संख्या सुमारे दोन टक्के म्हणजे सत्तर लाखांनी वाढण्याचा अंदाज आहे. मोठ्या लोकसंख्येला गरिबी आणि बेरोजगारीच्या कक्षेतून बाहेर काढायचे असेल, तर उदयोन्मुख रोजगार क्षेत्रांच्या विविध पद्धतीनुसार कौशल्य विकास करावा लागेल. भारतातील पूर्वीची शिक्षणपद्धती उपजीविकेची हमी देत नव्हती. कौशल्यांमधील अंतर सर्व स्तरांवर आहे. त्यामुळेच तीस टक्क्यांहून अधिक उच्च शिक्षित तरुण बेरोजगार आहेत. कुशल कामगारांची कमतरता ही नियोक्त्यांना भेडसावणारी एक अडचण आहे, ज्यामुळे त्यांच्या नवनिर्मितीच्या क्षमतेवर परिणाम होतो. भारताला कुशल मानव संसाधनाची गरज आहे जे नावीन्य आणि वाढीसाठी उत्प्रेरक म्हणून काम करू शकतात. कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणासाठी सार्वत्रिक पोहोच हे देशातील एक गंभीर आव्हान आहे. अनेक विद्यार्थी औपचारिक शिक्षणापासून वंचित राहतात, ज्यामुळे त्यांच्या आयुष्यातील कमाईच्या क्षमतेवर परिणाम होतो. पिढी-दर-पिढी कौशल्य हस्तांतरणामुळे पारंपारिक भारतीय व्यवसायांमध्ये उद्योजकता आणि उपजीविकेसाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत. पण काळानुसार व्यवसाय आणि संधींचे स्वरूप बदलले आहे. स्वतंत्र भारतात, आर्थिक विकासाच्या गांधीवादी मॉडेलपेक्षा महालनोबिस मॉडेलमधील उच्च व्यावसायिक संस्थांवर भर दिल्यामुळे शालेय व्यावसायिक शिक्षण मागे राहिले. शिक्षण आणि कौशल्य विकास यांच्यातील वाढलेले पृथक्करण, वैयक्तिक प्रगती उच्च शिक्षणाशी जोडलेली आहे, कौशल्य विकासाशी नाही. परिणामी, आज केवळ दोन टक्के व्यावसायिक पेशेवर कामगार औपचारिकपणे कुशल आहेत. कौशल्य विकासासाठी राष्ट्रीय कौशल्य धोरण 2009 सोबतच, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ, राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था, राष्ट्रीय कौशल्य पात्रता फ्रेमवर्क आणि सेक्टर स्किल कौन्सिलची स्थापना करून शिक्षण आणि कौशल्यांमध्ये समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा औपचारिक आणि व्यावसायिक शिक्षणाला गतिशीलता प्रदान करून शिक्षण आणि कौशल्य विकासाचे एकत्रीकरण करते. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय कौशल्य विकास कार्यक्रमांचे समन्वयन करते.मेक इन इंडिया आणि स्किल इंडिया कार्यक्रम हे शिक्षण आणि कौशल्य विकासाचे आंतरसंबंध मजबूत करतात, औपचारिक कौशल्यांमध्ये तरुणांची रुची वाढवतात आणि शैक्षणिक पात्रतेसह कौशल्य प्रमाणपत्राला मान्यता देतात. सुमारे वीस मंत्रालये आणि विभागांच्या कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे देशात एक कुशल मनुष्यबळ तयार केले जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व्यापक संज्ञानात्मक कौशल्यांवर भर देते, ज्यामध्ये अनुभव आणि तर्काद्वारे जटिल कल्पना शिकण्याची, समजून घेण्याची आणि लागू करण्याची क्षमता समाविष्ट आहे. तांत्रिक कौशल्यामध्ये विशिष्ट कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्य असते. डिजिटल कौशल्ये इतर सर्व कौशल्यांमध्ये प्रवेश करण्याची, व्यवस्थापित करण्याची, संवाद साधण्याची, समजून घेण्याची, मूल्यांकन करण्याची आणि स्वीकारण्याची क्षमता प्रदान करतात. NEP रॉट लर्निंगऐवजी सर्जनशील आणि क्रिटिकल विचारसरणीसह आउट-ऑफ-द-बॉक्स विचार आणि निर्णय घेण्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. बहुविद्याशाखीय दृष्टिकोनासह, विद्यार्थी त्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम निवडण्यास सक्षम असतील. एनईपी उद्योगांच्या गरजेनुसार शिक्षणातील कौशल्य विकास अभ्यासक्रम, भारतीय तरुणांना कुशल आणि स्वावलंबी बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील. कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणाचा शैक्षणिक व्यवस्थेत समावेश करून, NEP केवळ उद्योगांच्या गरजेनुसार मनुष्यबळ निर्माण करणार नाही तर शिक्षणाचा दर्जाही वाढवेल. शालेय शिक्षणासोबत व्यावसायिक शिक्षणाची सांगड घालण्याचा उद्देश हा आहे की, शिक्षणाला रोजगारक्षम बनवताना कौशल्य विकासाद्वारे तरुणांना स्वावलंबी बनवणे. यामध्ये पारंपारिक कौशल्य विकासासाठी सुतारकाम, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, फलोत्पादन, कुंभारकाम, भरतकाम-विणकाम इत्यादींचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. 2025 पर्यंत 50 टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय कौशल्य पात्रता फ्रेमवर्क (NSQF) एक राष्ट्रीय स्तरावरील एकात्मिक शिक्षण आणि गुणवत्तेच्या खात्रीसाठी सक्षमतेवर आधारित कौशल्य फ्रेमवर्क आहे, जे व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण, सामान्य शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण तसेच क्रॉसमध्ये क्षैतिज आणि उभ्या एकत्रीकरणासाठी अनेक संधी प्रदान करण्याचा प्रयत्न करते. - एका कौशल्याचे दुसऱ्या कौशल्याचे कौशल्य विकासाच्या पातळीशी संबंध जोडते. यामध्ये इयत्ता 9-10 मध्ये व्होकेशनल मॉड्युल हा स्वतंत्र पर्यायी विषय असेल आणि इयत्ता 11-12 मध्ये व्होकेशनल कोर्स हा अनिवार्य विषय असेल. राज्य सरकारांनी सामान्य अभ्यासक्रमांच्या बरोबरीने व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शालेय व्यावसायिक कौशल्ये उच्च शिक्षणापर्यंत वाढवता येतात. कौशल्य विकास, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम युवकांना, विशेषतः महिलांना चांगल्या नोकऱ्यांसाठी स्पर्धा करण्यास सक्षम करतील. अशा प्रयत्नांमध्ये स्थानिक नियोक्त्यांना सहभागी करून घेणे महत्त्वाचे आहे जेणेकरून अभ्यासक्रम श्रमिक बाजाराच्या गरजेनुसार तयार केला जाईल.



नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क (NCRF) हे राष्ट्रीय स्तरावर क्रेडिट जमा करणे आणि हस्तांतरण प्रणालीचे औपचारिकीकरण करून कौशल्य विकास हा शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनवणारा एक दस्तऐवज आहे. हे सामान्य शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण एकत्रित करून कौशल्य विकासासह दर्जेदार शिक्षणाच्या संधी सुनिश्चित करेल. NCRF हे सर्वसमावेशक, बहुविद्याशाखीय, सर्वांगीण शिक्षणासाठी एक फ्रेमवर्क आहे, जे विषयांच्या पर्यायांसह आणि त्यांच्या सर्जनशील संयोजनांसह गरजेवर आधारित अभ्यासक्रम ऑफर करेल. NCRF शिकण्याच्या विविध क्षेत्रांना समान महत्त्व देऊन कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करते.उच्च शिक्षणातील कौशल्य प्रशिक्षणासाठी क्रेडिट कमाईची तरतूद कर्मचाऱ्यांची कौशल्य पातळी वाढवून, प्रादेशिक विकासासाठी कुशल कामगार उपलब्ध करून प्रशिक्षण आणि रोजगाराला प्रोत्साहन देईल. कौशल्य विकास कार्यक्रमांना वित्त आणि गुणवत्तेच्या समस्यांचा सामना करावा लागतो, तसेच उच्च खर्च अपेक्षित असल्याने वंचित तरुणांना या कार्यक्रमांमध्ये मर्यादित प्रवेश असतो. आणि ही एक समस्या आहे. अनुभव दर्शवितो की उच्च कौशल्य विकास असलेले देश देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय श्रमिक बाजारातील आव्हानांना प्रभावीपणे प्रतिसाद देतात.

NEP 2020 मुळे शिक्षण आणि कौशल्य विकास यातील पृथक्करण संपुष्टात येईल. तो दिवस दूर नाही जेव्हा भारतातील तरुण, कौशल्य विकास आणि व्यावसायिक, रोजगारक्षम शिक्षणाद्वारे, उपजीविका शोधणारे नव्हे तर रोजगार देणारा बनतील. भारताने केवळ कौशल्य विकासावरच नव्हे तर कौशल्यावर आधारित रोजगार संधींवरही भर दिला पाहिजे. उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकास केल्यास सुशिक्षित बेरोजगारीच्या संकटातून सुटका होऊ शकते.सत्य हे आहे की भारतातील गरिबीसह ग्रामीण बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न कौशल्य विकासानेच सुटू शकतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला या दिशेने प्रात्यक्षिक आधारावर प्रामाणिक प्रयत्न करावे लागतील, हाही त्याच्या मूल्यमापनाचा आधार असेल.

# या शेताने लळा लाविला...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**"रानातल्या कविता " हा रानकवी पद्मश्री ना.धों.महानोर ह्यांचा पहिला काव्य संग्रह.१९६७ साली नवे कवी -नवी कवीता ह्या मालिकेत पाप्युलर प्रकाशनाने तो प्रसिद्ध केला.त्याला राज्यशासनाचे केशवसुत पारितोषिक ही मिळाले. ह्या शेताने लळा लाविला असा असा की सुखदुःखाला परस्परांशी हसलो-रडलो... आता तर हा जीवच अवघा असा जखडला मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो..... कविता संग्रहातील ही पहिलीच कविता महनोरांचा शेती विषयीचा जिव्हाळा, प्रेम,व्यक्त करते.शेत,रान,हे महानोरांचे बलस्थान आहे.रानाचे,शेताचे आणि महानोरांचे एकमेकावर अतिशय प्रेम आहे.**

एकमेकांच्या सुखदुःखात एकरूप झालेले आहेत. एकमेकांना एकमेकांचा लळा लागला आहे....निसर्ग.. रान..शेतीशी ते आपलं सुख दुखः विषयी बोलतात ,हे बोलणेच त्यांची कविता होऊन आपल्या समोर उभी आहे...शेतावरील समृध्द अनुभवाने ती नटली आहे. कुठेही अनुभवाची औपचारीकता नाही.

महानोरांचे कविते बद्दल विजया राजाध्यक्ष म्हणतात-"रान हे त्यांचे ध्यान,त्यांचा साक्षात्कार. एकदा हा साक्षात्कार झाला की नभ आणि भुई यांच्यातील भावसंबंध जाणवू लागतो.डोळे भरून येतात.जीव तेथेच गुंतून राहातो...हीच भावना महानोर आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त करतात.

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे...

रानातल्या कवितेच्या पासून त्याचा हा प्रवास अखंड सुरू आहे...

पानझड, पावसाळी कविता, पक्षांचे लक्ष थवे,दिवे लागणीची वेळ,पळसखेड ची गाणी, वही,अजिंठा, कविता संग्रह. तसेच रानगंधाचे गारुड, अंगारमाती, आनंदयोगी पु.ल. ,शेती आत्मनाश व नवसंजीवन, यशवंतराव चव्हाण, शरद पवार आणि मी,विधान भवनातून,या शेताने लळा लाविला, प्रार्थना दयाघना,जगाला प्रेम अर्पावे,गंगा वाहू दे निर्मळ,गांधारी कादंबरी,

आणी शेती विषयावर मार्गदर्शन करणारी ,कमी पाण्यावर येणाऱ्या तेलबिया, मोसंबी, मिरची, कमी पाण्यावरची वनशेती,फलोत्पादन, शेती साठी पाणी,सीताफळ बागेची गोष्ट,अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिलीत ...

ह्या सर्व प्रवासात शेतीला मात्र त्यांनी आज पर्यंत घट्ट धरुन ठेवले आहे.

पळसखेड हे सोयगाव तालुक्यातील महानोरांचे लहानसे खेडगांव.वडिलांनी पंचवीस -तीस वर्ष जमीनदारांचे कडे शेतावर मजुरी केली..ती करत असता उसनवारीवर पैसे घेउन थोडी जमीन घेतली. जमीन बरड असल्याने खूप कष्ट करावे लागायचे... त्यात विहीर खोदली..तिला ब-या पैकी पाणी लागल. त्यात मिरची,गहू, हरभरा,ज्वारी, बाजरी, कपाशी, अशी पिक येऊ लागली.बेताची आर्थिक परिस्थिती आणि वडिलांना शेतीत मदत म्हणून काँलेजचे शिक्षण सोडून शेती करायला घरी परत आले.महानोर सांगतात- "शिक्षण सोडल्याने सगळं गाव मला हसायचा.पण त्या कडे दुर्लक्ष करुन मी शेती करु लागलो.कृषितज्ञालाही लाजवेल असा अनुभव त्यांच्या वडिलांना होता.हळूहळू विहिरीवर मशिन बसवले. बागायती करु लागलो.शेती आणि शेतक-यांविषयी नितांत प्रेम असल्यामुळे मी शेती करत होतो.तिथल्या पिकांचा मला लळा लागला होता.शेतातल्या झोपडीत राहाणे मला आवडायचे."ह्या झोपडीतच त्यांनी अनेक पुस्तकांच वाचन कंदिलाचे प्रकाशात केल.


शेती विषयी अनेक प्रयोग त्यानी केले.थोडं पाणी असेल तर शेतीइतकं सुंदर काही नाही असे त्यांनी केलेल्या प्रयोगातून दाखविले. त्यांचे हे शेतीवरचे प्रयोग पहाण्यासाठी पु.ल.देशपांडे, सुनीताबाई,बा.भ.बोरकर,गोविंदराव तळवळकर, दोन दिवस पळसखेडला येऊन राहिले. त्यावेळी उरळीकांचनचे नामवंत शेतकरी बापू कांचन ही सोबत होते..

त्यांच्या कुटुंबाला अनेक प्रतिकूल प्रसंगातून जावे लागले .अनेक आघात झाले.

अनेक अडचणीवर मात करुन शेती करत होते.. ते म्हणतात "कधी जमलं कधी जमले नाही,हरलो म्हणून थांबलो नाही की नाराज झालो नाही.शेती करायची तर हुरहुन्नरी पद्धतीने. जिथून मिळेल तिथून शेतीच ज्ञान घेउन प्रयोग करत राहिलो. प्रत्येक पिकाच्या हंगामाने, फळांच्या हंगामाने पुष्कळ दिलं.. कवितेनीही खूप हात दिला.अनेक पुरस्कार मिळाले. त्यामुळे फार मोठा आर्थिक आधार मिळाला."

सततचे दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट,सारख्या संकटांना तोंड देत शेतीत टिकून जिद्दीने उभा राहिलो. नवनवीन प्रयोग करुन शेती बहरत गेलो.

शेती..आणि कविता ..ह्या प्रवासात महानोरांनी ..जैत रे जैत,सर्जा, एक होता विदूषक,दोघी,मुक्ता, अजिंठा, सह जवळजवळ अकरा चित्रपटात गितं



लिहिलीत..जैत रे जैत साठी तर सोळा गितें लिहिलीत.. ती खूप लोकप्रिय झाली.."पद्मश्री" मिळाली.पानझड कविता संग्रहाला -साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला,कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा -जनस्थान पुरस्कारमिळाला,महाराष्ट्र शासनाचा-जीवन गौरव पुरस्कार, म.टा.चा -महाराष्ट्र भुषण,यशवंराव चव्हाण प्रतिष्ठानचा-यशवंत वेणू,ए.बी.पी.माझाचा -सन्मान पुरस्कार, पंजाबराव कृषीविद्यापिठाचा कृषीरत्न पुरस्कार. अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मनित झाले. बारा वर्षे ते विधान परिषदेत आमदार होते.त्या काळात साहित्या सोबत शेती विषयालाही तेवढेच प्राधान्य दिले.नवलेखकाच्या पहिल्या पुस्तकाला शासकिय अनुदान देण्याचा निर्णय त्यांचेच कार्य काळात झाला,तर पाणी अडवा पाणी जिरवा कार्यक्रम घोषणा त्यांनी केली. मंत्रीपदाची विचारणा झाली होती परंतु त्यांनी राजकारणात न जाता साहित्य आणि शेतीच्या प्रश्नांना वाहून घेतले होते.

बृहन्महाराष्ट्र साहित्य संमेलन -न्यू जर्सी, कँलीफोर्निया,जागतिक मराठी साहित्य संमेलन -माँरीशस,ईथेही साहित्य संम्मेलना बरोबर तिथल्या शेतीचा विचार मनात ठेवून ,पाहणी करुन आपल्याला काही करता येईल का ? हा विचार घेउन येत होते.

२००१ मध्ये नागपूरला झालेल्या अ.भारतीय जल साहित्य संमेलनचे अध्यक्षपद त्यांनी भुषविले.

शेतीतून कविता, आणि कवितेत शेती..निसर्ग ह्या परस्परांशी जोडलेल्या गोष्टी होत्या..

शेती ही केवळ शेतक-यांची नसते, सगळ्यांची असते.संपूर्ण देशाला उभारणी देणारी असते.शेती मोडली तर संपूर्ण देश मोडण्याची शक्यता असते. अस स्पष्ट मत ते मांडतात.सर्व शेतक-यांना संपूर्ण कर्ज माफीच ते समर्थन करीत नाही.कर्ज माफीच्या सवयीने देश-शेतकरी पांगळा,आळशी होण्याची भिती व्यक्त करतात. त्या ऐवजी दीर्घकाल कर्ज,विजेची उपलब्धी मालाला भाव,सोई सुविधांच द्या हि अपेक्षा व्यक्त करतात.आत्महत्येचा मार्ग अत्यंत चुकीचा मार्ग आहे,उभारीचे दिवस येत असतात..हा विश्वास ते शेतक-यांना देतात.या नभाने दान द्यावे म्हणून प्रार्थना करतात.

पु.ल.देशपांडे, सुनीता बाई,माधवराव चितळे,किर्लोस्कर, शंकरराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण, शरद पवार,गोपिनाथ मुंढे,एकनाथ खडसे,मंगेशकर कुटुंबीय,अनेक मान्यवरांनी पळसखेड ला भेट दिली.अनेकदा काव्यवाचनाचे कार्यक्रम रंगले,त्या सोबत शेती विषयक चर्चा घडून आल्यात.शहरी राजकारण्यांशी,कलाकारांशी,साहित्यिकांशी त्याचा जवळून संबंध आला.कारण परत्वे शहरां मध्ये राहणे झाले,पण त्यांचा पळसखेड मधला साधेपणा तसाच राहिला आहे.मुंबई -पुण्यात घर बंगला घेवून राहण्याचा मोह त्यांना झाला नाही.शेत आणि कविता ह्यातच ते पूर्ण रमले आहेत..अजूनही आपल्या शेतावरच त्यांचा रहिवास आहे.

पंचेहत्तरीचे अमृत मोहोत्सवी कार्यक्रमात, पु.ल.देशपांडे ह्याची आठवण सांगताना शरद पवार म्हणाले -पु.ल.म्हणायचे "महानोर कविता म्हणताना धो धो बरसतात.ते ना.धों .नाही तर धो धो महानोर आहेत."

आणि खरच आहे .काही दिवसापूर्वी मला त्यांचे निसर्ग रम्य शेतावर जाण्याचा योग आला.आणि ह्या धो धो बरसण्याचा अनुभव मी घेतला.महानोर तिथे होते.मग काय बऱ्याच गप्पा गोष्टी झाल्यात.कविता -शेती-चित्रपट -राजकारण,साहित्य संमेलन, प्रत्यक्ष महानोरां कडून -

ह्या शेताने लळा लाविला असा असा की...आणी ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे..आणि ह्या मातीतूनी चैतन्य गावे.. ..कविता ऐकायला मिळाल्या.. महानोरांची कविता बरसत होती त्याच वेळी पाऊस धो धो बरसत होता..आणि आम्ही त्याचे सोबत वाफाळलेल्या चहाचा आस्वाद घेत होतो.....

त्यांचीच एक पावसाळी कविता...

मी माझ्या मुलखात नांदतो ऐश्वर्याचा राजा.
ईथल्या मातीमध्ये रूजविल्या चैतन्याच्या बागा
इथले रानोमाळ सघन घन पसरित हिरवी द्वाही
झुलत झुलत मस्तीत बुडाले गाणे आणिक
मीही...

ह्या त्याच्याच कवितेचा प्रत्यक्षात अनुभव घेउन तृप्त झालो.

आज ना.धों.महानोर आपल्यातून गेले असले तरीही त्यांचे प्राण या रानातच गुंतलेले आहेत, त्यांचा साहित्याचा कवितांचा खूप मोठा ठेवा ते आपल्यासाठी ठेवून गेले आहेत.

महानोर दादांना भावपूर्ण आदरांजली

# ना.धों. महानोरांच्या कवितेतील रानावनात विरलेली स्त्री



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**मी रात टाकली, मी कात टाकली। मी मुडक्या संसाराची बाई लाज टाकली। ज्या संसारांमध्ये तिचे मन रमत नाही, तिच्या कोणत्याही गरजा पूर्ण होत नाहीत त्या संसाराला निरोप देताना तिला लाज वाटत नाही अशी बिनधास्त, सडेतोड स्त्री महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी ना धों महानोर यांच्या गीतांमधून आपल्याला भेटते. अठरा विश्व दारिद्र्य, धड खायला नाही धड ल्यायला नाही. मानसिक समाधान नाही, भावनिक आणि शारीरिक समाधान सुद्धा मिळत नाही मग अशावेळी असा संसार सोडताना कशाची तमा बाळगावी? असा विचार करून महानोरांच्या कवितेमधील स्त्री पुढे म्हणते, ह्या पंखांवरती, मी नभ पांघरती।मी मुक्त मोरनी बाई, चांदन्यात न्हाती।**

आधुनिक केसरी

***(मागील अंकावरून)*** अशा घरादाराचे शिव्याशाप, मारहाण सहन करून मेटाकुटीस आलेले हे जीवन खरेतर मातीमोल असते मात्र त्यातही तिला थोडाफार आधार असतो आपल्या माहेराचा, माहेर पणाची भावना व्यक्त करताना कवी म्हणतात, ऐन पंचविशीत म्हातारपण सोसतांना... भरल्या संसारात मन जळून जाताना... कुठे शब्द बोलण्याचा तिला अधिकार नाही. प्रत्येक गर्भारपणात माहेरच्या आठवणीत ती जळून जाई. एका विशिष्ट टप्प्यावर तिला तिचे माहेर सुद्धा पोरके ठरते अशा आशयाची स्त्रीचे दुःख मांडणारी कविता तिची कहाणी मधून अस्वस्थ करून जाते. तिचे दुःख इतके भीषण आहे की ह्या स्त्रिया देवाला विनंती करताना आपल्याला बाईचा जन्म पुन्हा देऊ नको अशी विनंती करताना दिसतात. त्या म्हणतात, बाईचा हा जन्म नको घालू सख्याहारी रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी, स्त्रीचा जन्म पुरुषाची गुलामी करण्यासाठी आहे, त्यातही तो पुरुष दिवस आणि रात्र न पाहता तिच्याकडून होईल ती सेवा करून घेत असतो, त्यामुळे अशा गुलामगिरीच्या जीवनापेक्षा बाईचा जन्म पुन्हा देऊ नको अशी विनंती स्त्रिया देवाला करतात, त्याचवेळी माय तुझ्या घरी मीन काम नाही केलं रांजणाच पाणी मले कोसावाणी झालं असे जेव्हा कवी लिहितात तेव्हा मुलीला तिची आई काम करू देत नाही, तिचे कोडकौतुक करते माहेरा मध्ये तिला काम नसते त्यामुळे सासरी रांजणातील पाणीसुद्धा तिला कोसभर अंतरावर आहे असे वाटू लागते. लेक सासरी फार कष्ट करते, तरी तिला सासुरवास होतो हे आईला माहीत असते म्हणून आखाजी नागपंचमी दिवाळी अशा वेगवेगळ्या सणाला ती मुलीला माहेरी घेऊन येते त्यामागे तिच्या मनामध्ये पुढील भावना असते, बहिणीने भाऊ एक तरी वो आसावा, थकल्या जीवाले एका रातीचा विसावा... मुलगी माहेरी आली म्हणजे तिला तेवढाच आराम मिळू शकतो अशी धारणा तिच्या आईचे असते आणि ती रास्त सुद्धा असते.

भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्री खरोखरच प्रचंड दुःखात राहुनही जेव्हा शेवटची घटका मोजते तेव्हा ती म्हणते, गेला मह्या जीव मले मातीशी खुटवा सोन्याच पिंपळपान महया माहेरी पाठवा
गेला महया जीव महया किल्डिले साखळ्या देर जेठ ओझाखांदे राम चालू द्या मोकळे, मी मेल्यावर माझ्या माहेरी निरोप पाठवा, माझी तिरडी दिर आणि जेठ यांना उचलू द्या नवऱ्याने आयुष्यभर माझे दुःखाचे ओझे वाहिले आहे त्यामुळे त्याला मोकळे चालू द्या एवढे विचार करूनच ती थांबत नाही तर आपल्या मागे आपल्या नवऱ्याचे हाल होऊ नये म्हणून
त्याने दुसरे लग्न करावे असे सुद्धा ती त्याला सुचवते. तशीही भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्री नवऱ्याला बहाल केलेली असते. नवऱ्याच्या संसारात रममाण झालेली स्त्री नवऱ्यासाठीच आपल आयुष्य मागत असते, दुबळी मी देवा मले दुबळे राहू दे, लग्नाचा जोडा सातजनमी जाऊ दे.. असे म्हणणारी स्त्री महानोरांच्या कवितेमध्ये सतत भेटत राहाते. ना धों महानोर यांच्या कवितेमध्ये स्त्रीचे दुःख आणि वेदना यांची मांडणी तर आहेच मात्र तितक्याच प्रभावीपणे कवितेमधील अल्लड अवखळ कधी प्रणयोत्सुक, अगदी आपल्या सौंदर्याने वेड लावणारी तर कधी अगदी उघड्यावर शरीरभोग देणारी अशी स्त्री त्यांनी उभी केली आहे. आज तिने कुठल्या साजनाला दूर नभातुन बोलाविले; भरात येउनी नग्न शरीरी उघड्यावरती भोग दिले . काचोळीची गाठ सावरीत हळू तयाला सांगितले; तिचिया पोटी पचघडीचे लख्ख चांदणे अवघडले. धरती जशी पावसाला उघड्यावर मिठी मारते त्याच आवेगाने प्रेमातून साजणी आपल्या प्रियकराला भेटते असे वर्णन कवी करतात
तसेही बऱ्याच ठिकाणी निसर्ग आणि स्त्री एकमेकांत मिसरून गेलेले दिसतात. तरीही ती अबोल... जरा दूर झाली लुगडं दूर फेकून नग्न नग्न झाली. नितळ भुऱ्या मांड्यावरती काळे डाग तिचा उभार देह एक जळती आग अशा बेधडक बिनधास्त वृत्तीची स्त्री महानोरांच्या कवितेमध्ये दिसते, तर कधी अगदी रान भलतच भरात जरा, पिकात धुडगूस घालून जा
असे आवाहन करणारी प्रणय उत्सुक स्त्री निसर्गदत्त शृंगार भावनेची मागणी करताना दिसते. ज्या अर्थी स्त्री स्वतः पुरुषाला शृंगारासाठी
आवाहन करते तेव्हा त्या स्त्री-पुरुषांमधील नाते ही



तितकेच अलवार आले निर्मळ असले पाहिजे. मग अशा स्त्री-पुरुष नात्यांमधील निरागसता कुठेही बीभत्स न होता महानोरांच्या कवितेमधील पोरी सारखे नितळ रूप घेऊन येतात असा धिंगाणा घालती रोज वाऱ्याला भरती, सारे कळू आले तरी पोरी झिम्माच खेळती. कधी महानोरांच्या कवितेमधील नवयौवना त्यातही गावात नव्याने आलेली म्हणजे शक्यतो नवपरिणीत अशी स्त्री असं एखादं पाखरू वेल्हाळ सारख्या वेल्हाळ शब्दरूपात समोर येते. तर कधी राजसा जवळी जरा बसा अशी प्रियकराला जवळ बसण्याची विनवणी करते. तर कधी पायात पैंजण मन ओलेचिंब कसाकाल धरू गर्भात लेकरू अशा गर्भवती स्त्रीच्या मनाचे स्पंदन महानोरांनी नेमकेपणाने टिपले आहे. डोळे भलतेच बोलके, नको पायात पैंजण, चोळीचा गाठीत मावेना स्तनभार, नागिन मैथुनात मग्न अशा कवितांमध्ये ठळकपणे आणि प्रभावीपणे प्रणयोत्सुक स्त्रीचा मनोभाव कवींनी अधोरेखित केलेला आहे. या कवितांमध्ये स्त्री ही तरुणी, नुकतीच यौवनात पदार्पण केलेली आणि शृंगारासाठी आसुसलेली असलेली दिसते. ना धों महानोर यांच्या अजिंठा मध्ये तर पारू आणि रॉबर्ट गील यांच्या भावनिक प्रेमाविष्कारात अजिंठा मनाला आणखी मोहून घेतो. मात्र पारुच्या निधनानंतर सर्वकाही सोडून जाणार गील निशब्द करून जातो. ती पाठमोरी बाई... अंबाडा शुभ्र पिवळी फुलं. भिक्षापात्रातला बुद्ध आणखी यशोधरा असा उल्लेख करून जगाची
दुःख मिटवणारा बुद्ध यशोधरेच्या दुःखाचे कारण झाला त्यामुळे दुःख हे चिरंतन आहे ते कोणीही नष्ट करू शकत नाही याची जाणीवही महानोरांनी करून दिली आहे. मेमरी ऑफ माय बिलव्हेड पारो अशी सुंदर कबर तयार करणारा गिल साब आणि रांगड्या सौंदर्याचा आविष्कार असणारी पारू यांची अनोखी प्रेमकथा अजिंठा मध्ये साकारली आहे. तर कधी शिवरायांची गाथा लिहिताना शिवरायांचा पाळणा ना धों महानोर ह्यांच्या लेखणीतून स्फुरलेला आठवतो. आता पाळणा आणि नाव ठेवणे हा स्त्री संस्काराचा अविभाज्य घटक आहे हे वेगळे सांगायला नको. असाच एक स्त्री संस्कार जो आपण सर्वत्र पाहतो तो म्हणजे सासा सुनेचे भांडण... ह्या सासासुनेच्या भांडणात आधी मुलगा जातो मग सूनही जाते आणि मग हतबल म्हातारी सुनेच्या मुलाला घास भरवते आणि त्या मुलांचे हाल पाहून स्वतः सुद्धा जीव सोडते मात्र मरताना लेकाचे आणि सुनेचे गुणगान गाते, अशी ही अतिशय विचार करायला लावणारी आणि स्त्री भूमिकेवर विचार करायला लावणारी कविता महानोरांच्या सूक्ष्म निरीक्षणातून जन्मास आली
आहे. नामाच्या किर्तनी - भेटली जनाई - विठ्ठल रुक्माई - भेटी आले।। कबिराचा दोहा- मीरा जनाबाई- सारे एक देही- माऊलीच्या।। अशा अभंगांमधून जनाबाई मीराबाई अशा संत स्त्रिया विठ्ठलाच्या बरोबरीने रुक्माई यांचा गौरव करत ना धों महानोर यांनी आपल्या कवितेमधून स्त्रियांना मानाचे स्थान देत त्यांचा गौरव केलेला आहेच शिवाय पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये त्यांचे महत्त्व सुद्धा अधोरेखित केल आहे. त्याच वेळी दारिद्र्याने पछाडलेल्या समाजव्यवस्थेमध्ये, पाणवटल्या डोळ्यांनी गोऱ्या राजाचे महिमान गाणारी जख्ख म्हातारी, मी पाहिल्या पासरीभर बाजरीवर भोग देणाऱ्या रूपवंत पोरी।। हा ठसठशीत अनुभव बधीर करून जाणारा असतो. तर त्याच प्रमाणे, ही दुसऱ्याची बाईल माझ्या घरात मी ठेवू कशी! चुलीवरच्या विस्तवाची ठिणगी मी झेलू कशी।। एखादेवेळी एखाद्या स्त्रीवर दुर्देवाने विधवा म्हणून किंवा घटस्फोटिता म्हणून जगण्याची वेळ आली असता तिच्या मनामध्ये दुसऱ्यांदा फुलून येणाऱ्या संसार स्वप्नाला भंग करण्याचे काम सर्वात प्रथम एक स्त्रीच करत असते. अशी स्पष्ट कल्पना ना धो महानोर यांनी आपल्या कवितांमधून करून दिलेली आहे वरील कविता त्याचेच एक उदाहरण आहे. कालानुरूप स्त्रीची रूपे बदलली तरी सुद्धा दुःख रूप
बदलून तिचा पिच्छा पुरवते. महानोरांच्या कवितेतील स्त्री निसर्गात मिसळली आहे त्यामुळे ती निसर्गा इतकीच बेहोष, बहकेलेली आणि उदास असते. महानोरांच्या कवितेमध्ये फक्त ग्रामीणच नाही तर प्रगत देशातील स्त्रीचे दुःखही आलेले दिसते. पन्नाशीच्या पोक्त बाईने सनफ्रान्सिस्कोच्या विमानतळावर केलेली आत्महत्या हे त्याचे एक उदाहरण आहे. त्यावरून समस्त स्त्री जातीचं दुःख जगाच्या पाठीवर सारखेच आहे असा संदेश कवी देतात. सुख दुःखाच्या झोक्यावर ह्या पुरुषी व्यवस्थेत स्त्री आपले आयुष्य कसे जगते त्याचे नेमके चित्रण कविवर्य ना धों महानोर ह्यांच्या कवितेमधून पाहायला मिळते हे निश्चितपणे म्हणता येते. अश्या ह्या रानकवींचे दिनांक 3 ऑगस्ट 2023 रोजी निधन झाले आणि एक निसर्गकल्लोळ शांत झाला.

# आठवणीतली गृहभेट



माधव आरुणराव डाके
संपर्क क्र. 9730115620

आधुनिक केसरी

**शाळा उघडून आता जवळजवळ सव्वा महिना लोटला होता. मुले आता शाळेत रमली होती. शिक्षक ही स्थिरावले होते. शाळेतून टीसी जाणे आणि शाळेत नवीन टीसी येणे ही प्रक्रिया ही आता मंदावली होती. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना आता प्रथम घटक चाचणीचे वेध लागले होते. यावर्षी जूनमध्ये पाऊस न झाल्याने जूनचा पंधरवाडा उकाड्यातच गेला होता.**

आधुनिक केसरी

***(मागील अंकावरून)*** त्या चाळीच्या मागच्या बाजूस एका कच्च्या रस्त्याने आम्ही एका मोठ्या डेरेदार चिंचेच्या वृक्षाजवळ पोहोचलो. आजूबाजूला ओसाड जागा, पावसामुळे सर्वत्र उगवलेले गवत,त्या कच्च्या रस्त्याने पुढे एका पत्र्याच्या शेड जवळ येऊन आम्ही थांबलो. विद्यार्थ्यांच्या नावाने बाहेरून मोठ्याने आवाज देताच, तो बाहेर आला. त्याचे विस्कटलेले केस, अंगावरचा शाळेचा मळालेला गणवेश परिधान केलेला तो सावळ्या रंगाचा मुलगा आम्हाला असा अचानक दारात पाहून आश्चर्यचकित झाला. या ना सर ...या ना मॅडम... असं म्हणू लागला...

" घरातल्या मोठ्या व्यक्तीस बाहेर बोलाव" असं पुढे होऊन मी म्हणालो. मी त्याला असे म्हणताच त्याने " "आजी,शाळेतले सर आणि मॅडम आले आहेत बाहेर ये."

असं मोठ्याने ओरडून आजीला आवाज दिला. थकलेला जर्जर झालेला एक अंशी - पंच्यांशी वर्षाचा स्त्री देह हळुवार चालत आमच्या जवळ आला. आजींकडे पाहत माझ्या सहकारी तम्मेवार मॅडमनी बोलायला सुरुवात केली. " आजी हा शाळेत खूप दंगा मस्ती करतो. हा अजिबात अभ्यास करत नाही. याला पालकाला बोलवून म्हटले, तरी याचे पालक शाळेत येत नाहीत. असं तम्मेवार मॅडम म्हणताच मी,देशमुख मॅडम आणि देशपांडे मॅडम यांनीही याच स्वरूपाची तक्रार आजींकडे केली. आजींनी आमच्या तक्रारी ऐकताच त्यांच्या डोळ्यात टचकन पाणी आले. आणि आजी बोलू लागल्या, " सर-मॅडम याचे वडील मजुरीने कामावर जातात. त्याचं हातावरचं पोट आहे. पोराला आई नाही. मी पडले म्हातारी. मला इथून एवढ्यात अंगणात सुद्धा चालता येत नाही. याच्यामागे कुठे पळू. हा शाळेतून आला की जेवण करतो;नि घराबाहेर पडतो. ते थेट संध्याकाळीच येतो. आजी पोट तिडकीने बोलत होत्या.

पोराला आई नाही म्हणून बाप ही त्याला मारत



नाही. हा मात्र त्याचा गैरफायदा घेतो. तुमचा निरोप मी त्याच्या बापाला सांगते. एवढी वेळेस त्याला माफ करा. असं म्हणून आपल्या अंगावरच्या लुगडयाच्या पदराने आजींनी स्वतः चे डोळे पुसले. त्या प्रचंड खिन्न झाल्या. घराच्या आजूबाजूचे गवत जणू त्याच्या घराला ( पत्र्याच् शेड ) झाकून टाकन्यासाठी सपर्धा करतेय असे वाटत होते. घराच्या समोर आजूबाजूला वेड्याबाभळीचे दाट जंगल वाढलेले होते. त्या बाभळीच्या खाली जमिनीकडे लोंबकाळणाऱ्या लांबच लांब फांद्यांनी ते घर पूर्ण झाकून गेले होते. मुलाचा चेहरा तात्पुरता का होईना 'केविलवाणा ' झाला होता. आजीचे हतबल बोलणे ऐकून आम्ही शिक्षक एकमेकांकडे पाहत उठलो.

" येतो आजी आम्ही आमचा निरोप द्या त्याच्या वडिलांना आणि शाळेत येऊन भेटायला सांगा त्यांना"

असं म्हणत आम्ही परतीच्या वाटेला लागलो. माझ्या डोळ्यासमोर आता त्या विद्यार्थ्याचे ते पत्र्याचे घर, घराच्या समोर आणि आजूबाजूला वाढलेले वेड्या बाभळीचे जंगल, आजूबाजूला वाढलेले आणि घरा बरोबर वाढण्यासाठी स्पर्धा करणारे दाट गवत, त्याची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती, थकलेल्या त्याच्या वृद्ध आजी आणि त्याचा तो ' केविलवाणा ' चेहरा हे सर्व माझ्या डोळ्यासमोर फिरत होते. त्याची आर्थिक परिस्थिती पाहून आम्ही एकमेकांना काहीही न बोलता शांतपणे शाळेच्या दिशेने निघालो होतो.....मनात मात्र घालमेल सुरू होती.....

# पेंशन धारकांचा संघर्ष



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**ईपीएस-95 पेन्शन धारकांना केंद्र सरकार आतातरी कमीत कमी 7500 रूपये पेंशन देईल? कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी. यासाठी अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरू आहे. परंतु जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.**

तरीही लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार आतातरी ईपीएस-95 च्या पेन्शन धारकांना न्याय देईल या आशेवर त्यांची उम्मीद टीकुन आहे. म्हणजेच "उम्मीद पर दुनिया कायम है" लोकसभेत दुनीयाभराचा गोंधळ होतो व सभा तहकूब होते. परंतु 78 लाख पेंशन धारकांबद्दल पक्ष-विपक्ष एकमत होत नाही ही वृध्दाच्या प्रती ( सिनियर सिटीझन )च्या प्रती मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.परंतु आमदार-खासदार आपले पगार व पेंशन वाढीचे विधेयक एका मिनिटात सर्वानुमते पारीत होते व जो कामगार-कर्मचारी मेहनत करतो त्याच्या गळ्यावर नेहमी पगार वाढीची टांगती तलवार दिसून येते.20 जुलै 2023 पासून सुरू झालेल्या पावसाळी अधिवेशनात ईपीस 95 पेन्शन धारकांना न्याय मिळेल किंवा नाही यात मोठी शंका वाटत आहे.

कारण कारण ईपीएस-95 पेन्शन बद्दल सरकार सोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसत आहे.परंतु पेन्शन धारक आशावादी आहेत त्यामुळे सरकार त्यांना अवश्य न्याय देईल असा पेंशन धारकांना विश्वास आहे. आज देशातील 78 लाख ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी 1000 व जास्तीत जास्त 3000 रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.या अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल,पाण्याचे बिल,घरटॅक्स, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा 1000 किंवा 3000 रूपयात कशाकाय पुर्ण होणार ? हे गांभीर्य पक्ष-विपक्ष किंवा सरकारला का दिसत नाही ?त्यामुळे आतातरी सुरू असलेल्या लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांचा विचार करून कमीत कमी 7 हजार 500 रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा लागू करण्याची घोषणा सरकारने करावी. 2013 मध्ये ईपीएस पेन्शन धारकांना न्याय मिळावा याकरिता 16 खासदारांची समिती नेमण्यात आली होती आणि समितीचे अध्यक्ष भगतसिंग कोशियारी होते.परंतु कोशियारी समिती धुळखात असल्यामुळे ईपीएस पेन्शन धारकांना आज कठीण परिस्थितीशी झुंज द्यावी लागत आहे. ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर व महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो.हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने ताबडतोब घ्यावी व चालू अधिवेशनात ईपीएस-1995 पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावावा.आज ईपीएस पेन्शन धारकांचे हाल-बेहाल होत आहे.करोना काळात व वृध्दापकाळाने आतापर्यंत लाखो पेंशन धारकांना आपले प्राण गमवावे लागले परंतु न्याय मिळाला नाही.त्यामुळे ताबडतोब हा प्रश्न मार्गी लागला पाहिजे.केंद्र सरकारने आतापर्यंत 78 लाख ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही 60 ते 80 वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले आहेत. कारण पेन्शन ही त्यांच्या "म्हारपणाची शीदोरी" आहे.त्यामुळे पेन्शन हे "जीवन-मरणाचे" साधन सुध्दा आहे.त्यामुळे आता सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता लोकसभा अधिवेशनात कमीत कमी 7500 रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्यात याव्यात. विदेशात पेन्शन धारक पेट्ुन उठतो व हिंसक वातावरण निर्माण होते याचे पडसाद फ्रांन्समध्ये आपल्याला मागे दिसून आले. फ्रांन्सचा पेन्शन धारक पेटुन उठला.परंतु भारतात "ईपीएफओ" ईपीएस पेन्शन धारकांना पेटवीत आहे. पेंशन धारकांची क्रूर आणि वेदना देणारी थट्टा केंद्र सरकार आतापर्यंत करीत आली.परंतु आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज 139 कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी 78 लाख पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे. परंतु सरकार ईपीएस-1995 च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा "अरबो रूपया" सरकारजवळ आहे हा पैसा सरकार "लोकप्रतिनिधीच्या" पगारासाठी व पेन्शनसाठी वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना "भिक"दील्यासारखी पेंशन देत आहे. ही "लोकशाहीला" काळीमा फासणारी बाब आहे. राजकीय पुढाऱ्यांचे पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू आहे याला काय म्हणावे ?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. मागील अधिवेशनात सरकारने अनेक विधेयक आणलीत व मंजूर केली.परंतु पेन्शन धारक आपल्या हक्काची लढाई लढत असताना सुध्दा त्यांच्या हाती निराशाच आली. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही "देर आज दुरूस्त आए" या आधारावर चालु अधिवेशनात ईपीएस-1995 च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दिलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा.

# हुतात्मा, माजी सैनिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविणार

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महसूल विभागाशी संबंधित सामान्य नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करण्याच्या उद्देशाने १ ऑगस्ट या महसूल दिनापासून 'महसूल सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहात हुतात्मा सैनिकांचे तसेच माजी सैनिकांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'सैनिक हो तुमच्यासाठी' हा उपक्रम राबवला जात आहे, अशी माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, नितीन दिनकर, राणी द्विवेदी – निघोट, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह आदी उपस्थित होते. या सप्ताहात वंचित घटकांच्या मदतीसाठी 'एक हात मदतीचा 'यासारखा अभिनव उपक्रम राबविला जात आहे, असेही श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

विखे पाटील यांनी सांगितले की, देशासाठी हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना तसेच माजी सैनिकांच्या कुटुंबियांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबियांना तसेच माजी सैनिकांना शासनाकडून दिल्या गेलेल्या जमिनीवर अतिक्रमणे होतात . अनेकदा कुटुंबियांना व माजी सैनिकांना जमिनीचा ताबा वेळेवर मिळत नाही. या संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने निकालात काढण्याचा प्रयत्न 'सैनिक हो तुमच्यासाठी' या उपक्रमातून केला जाणार आहे. या पद्धतीचा उपक्रम देशात प्रथमच राबविला जात आहे.

एक हात मदतीचा या उपक्रमात रायगड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या दुर्घटनेत ज्यांना सर्वस्व गमवावे लागले अशा लोकांना जमिनीचे पट्टे तातडीने देण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नागरिकांचे अर्ज तसेच तक्रारी यांचा वेळेत निपटारा करुन जनतेला दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न १ ते ७ ऑगस्ट या दरम्यान साजरा होणा-या महसूल सप्ताहात करण्यात येत आहे. नवमतदार नोंदणी उपक्रमाबरोबरच विविध महाविद्यालयांमध्ये जाऊन युवा संवाद कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध दाखले व योजनांची माहिती दिली जात आहे. महसूल विभागाने वर्षभर केलेल्या कामकाजाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यासाठी दरवर्षी 1 ऑगस्ट हा 'महसूल दिन' म्हणून राज्यभरात साजरा करण्यात येतो. यंदा महसूल सप्ताह आयोजित करून या अभियानाला व्यापक स्वरूप देण्याचा निर्णय विभागाने घेतला असल्याचे श्री. विखे पाटील यांनी नमूद केले.

# संविधान दिनी संविधान गुणगौरव परीक्षा

## जास्तीत जास्त परीक्षार्थींनी सहभागी होण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशी गायकवाड**

**लोणंद :** जनमानसात संविधानिक आदर्श व मूल्ये रुजावीत, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन संविधान गुणगौरव समिती यांच्या वतीने सातत्याने केले जात असते. सभा, संमेलनांसह दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून रोजच्या रोज संविधानाच्या प्रत्येक अनुच्छेदाची सर्वांगाने माहिती साध्या-सोप्या भाषेत प्रसारित करण्याचा उपक्रम नित्यनियमाने चालू आहे.याच उपक्रमांचा पुढील भाग म्हणून गेल्या दोन वर्षांपासून संविधान स्विकृती दिनाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर या दिवशी संविधान गुण गौरव परीक्षेचे महाराष्ट्र राज्य स्तरावर आयोजन करण्यात येत असते. या वर्षी सुद्धा ही परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती नूरखा पठाण आणि विलास पवार यांनी दिलेली आहे.

गेल्या वर्षी 3 हजारांहून अधिक परीक्षार्थींनी या परीक्षेत सहभाग घेतला होता. तसेच शालेय विद्यार्थी शिक्षकवृंद यांचाही ही विशेष सहभाग पाहायला मिळाला होता. जनमानसांपर्यंत संविधान जनजागृतीची चळवळ पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जात असून सदर परीक्षा लहान व मोठा अशा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा 'लहान गट' व इ. १२ वी पुढील सर्व विद्यार्थ्यांचा 'मोठा गट' या स्वरूपात असणार आहे.

परीक्षेच्या अभ्यासासाठी नुरखाँ पठाण लिखित 'आपले संविधान...राज्यपद्धती नव्हे,तर जीवनपद्धती' या पुस्तकावर आधारित असणार आहे. संविधान क्षेत्रातील मान्यवरांचे ऑनलाईन मार्गदर्शन परीक्षार्थींना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.दोन्ही गटातून प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांकाचे तसेच एक उत्तेजनार्थ बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर परीक्षा ही दोन्ही गटांसाठी १०० गुणांची असून त्यात ५० प्रश्नांचा समावेश केला जाणार आहे. सदर परीक्षेसाठी एक तासाचा अवधी देण्यात येणार असून पर्यवेक्षीय यंत्रणेच्या निरीक्षणाखाली ही परीक्षा शाळा, कॉलेज व अन्य सोयीस्कर ठिकाणी आयोजित केली जाईल. परीक्षेसाठी सहभागी होण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२३ ही देण्यात आलेली असून परीक्षार्थींना अभ्यासासाठी जास्त कालावधी उपलब्ध व्हावा.म्हणून ४ महिने अगोदरच यासाठी मेहनत घेतली जात आहे. जास्तीत जास्त परीक्षार्थींनी या परीक्षेत सहभागी व्हावे, असे आवाहन संविधान गुण गौरव समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.



# सुलतानपूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील औरंगाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष स्व. साहेबराव सुलतानपुरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त सुलतानपुर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास किरण पाटील डोणगावकर, चंदकांत भराट, अनिल पाटील श्रीखंडे, पुंजाजी अण्णा नलावडे, दिलीप दादा श्रीखंडे किशोर कुकलारे, वसंतराव नलावडे, आबाराव चव्हाण मिठ्ठु महालकर, ॲड अनिल नलावडे, मनोहर अण्णा चव्हाण, प्रकाश श्रीखंडे, सुरेश जाधव, शेषराव चव्हाण, अरुण खंडागळे, विष्णू चव्हाण, सय्यद लाल,शेख हबीब मा सरपंच चंपालाल जेसोरिया संपत जाधव अशोक लगड व मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व पदाधिकारी उपस्थित होते.



हिंगोली येथील प्रथम वर्ग वैद्यकीय अधिकारी डॉ. विठ्ठल रोडगे यांनी मर्थकांसह शुक्रवारी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी डॉ. रोडगे यांचे स्वागत केले. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी , माजी आमदार गजानन घुगे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यालयात विद्यार्थ्यांना युवा संवाद कार्यक्रमात प्रमाणपत्रे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयात औरंगाबाद जिल्ह्यात व सोयगाव १ ते ७ ऑगस्टदरम्यान 'महसूल सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येत असून शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे तात्काळ निर्गमित करण्यासाठी सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागामार्फत शाळेत युवा संवाद हा कार्यक्रम घेण्यात येत आहे. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे व आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांचे वाटप व माहिती सावळदबारा सज्जाचे तलाठी व्ही आर सेलकर व मंडळ अधिकारी प्रशांत पानसरे यांनी या महसूल विभागाकडून शालेय शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी लागणारे उत्पन्न प्रमाणपत्र व आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांचे वाटप शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील,महा-ई सेतू सुविधा केंद्र टिटवीचे मालक सुनील माकोडे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. एक हात मदतीया उपक्रमांतर्गत अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे बाधित शेतकरी व नागरिकांना मदतनिधीचे वाटप या आभियानांतर्गत करण्यात येणार आहे. सलोखा योजनेत शेतरस्त्यांच्या समस्यांचे निवारण निराकरण करण्यात येणार आहे. ७ ऑगस्टला सोयगाव महसूल सप्ताहादरम्यान केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेण्यासाठी 'महसूल सप्ताह सांगता समारंभ होणार आहे. तलाठी सजा व्ही आर सेलकर,मंडळ अधिकारी प्रशांत पानसरे, सुनील माकोडे अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# सोनगीर टोल नाक्यावर पँथर सेनेचा दणका

## टोल वसुलीचा भोंगळ कारभारावर कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रात्री ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पँथर दिपक भाई केदार हे सुरत, नंदूरबार दौरा करून येत असताना धुळे येथील सोनगीर टोल प्लाझा वर 1.30 मिनिटांनी गाडी आली असता सोनगीर टोल वरचे कर्मचारी बूथ ऑपरेटर व सेक्युरिटी गार्ड या दोन लोकांनी पँथर दिपक भाई केदार यांना अपमानास्पद वागणूक दिली व फास्ट टॅग असूनही बँकेचा एरर दाखवत होता असा आरोप पॅंथर सेनेकडून करण्यात आला म्हणून दिपक केदार यांच्या कडून डबल चा टोल वसूल केला पँथर दिपक भाई केदार यांनी रात्री 2 वाजता धुळे पॅंथर सेनेला कॉल करून कळवल म्हणून यांनी दिपक केदार यांना औरंगाबाद साईड ला रवाना केले व ठीक सकाळी 11.00 वाजता सोनगीर टोल नाक्यावर सर्व पँथर सेनेचे पद अधिकारी पोहचले कर्मचाऱ्यांचा गोंधळ उडाला कर्मचाऱ्यांनी तात्काळ पोलीस गाडी



बोलून आमच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला असा आरोप पॅंथर सेनेच्या वतीने करण्यात आला. पण पोलीस प्रशासनाच्या दबावाला न घाबरता ऑल इंडिया पॅंथर सेनेच्या कार्यकर्त्यांनी टोल मॅनेजर याला निवेदन देऊन व सोनगीर पोलिस स्टेशनचे एपीआय गणेश फड यांना निवेदन देऊन कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे सांगितले आणि जो कोणी टोल कर्मचारी असेल त्याने ऑन रेकॉर्ड माफी मागावी असा आव्हान करून सोनगीर टोल प्लाझा वाल्यांना पँथर स्टाईल दणका दिला व ठणकावून सांगितले यापुढे ऑल इंडिया पॅंथर सेनेच्या व आंबेडकरी नेत्यांच्या व दलित नेत्यांच्या गाड्या जर अडवल्या तर टोल नाका फोडल्याशिवाय ऑल इंडिया पॅंथर सेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी राहणार नाही असे आवाहनही करण्यात आले. याची नोंद टोल मॅनेजर शिवकुमार यांनी घ्यावी अन्यथा वाईट परिणामास स्वतः टोल कर्मचारी आणि टोल प्लाजा मॅनेजर हे सर्व जबाबदार असतील एकही आंबेडकर नेत्याची गाडी सोनगीर टोल असो अवधान टोलासो किंवा महाराष्ट्रातले कुठल्याही टोल असो आंबेडकरी नेत्याचे व दलित नेत्याचे गाड्या टोल फ्री करण्यात यावा ही मागणी ऑल इंडिया पॅंथर सेनेचे आहे यावेळी धुळे जिल्हा अध्यक्ष सागर भाऊ मोहिते जिल्हा महासचिव आनंद अमृत सागर धुळे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब बळसाने महिला जिल्हा उपाध्यक्ष अनिताताई सोनवणे महिला शहर अध्यक्ष हर्षाली ताई साळवे महिला तालुका अध्यक्ष सुनिता ताई गोपाळ सखुबाई लोंढे कायदेशीर सल्लागार एडवोकेट सागर भाऊ झाल्टे तालुका सदस्य हर्षल भाऊ जाधव सामाजिक कार्यकर्ते गौतम मोरे सामाजिक कार्यकर्ते आकाश कदम मयूर पगारे समाधान सोनवणे अर्जुन कांबळे व आदी पँथर उपस्थित होते.

# ताब्यात घेतल्यानंतर मेजर पुन्हा फरार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पंजाबमध्ये कर्तव्यावर असताना अचानक फरार झालेल्या मेजरला सैन्य अधिकाऱ्यांनी सापळा रचून ताब्यात घेतले होते. सैन्याच्या ताब्यातून त्या मेजरने दोन दिवसातच पुन्हा पळ काढला.या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून या प्रकरणी कामठी पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. मेजर राजीव धालसिंह बोपचे ( ३५, सिवनी, मध्यप्रदेश ) असे संबंधित फरारी अधिकाऱ्याचे नाव आहे.

बोपचेची पंजाब येथील भटिंडा येथे पोस्टिंग होती व फेब्रुवारी २०२० मध्ये सैन्याकडून बोपचेला फरार घोषित करण्यात आले होते. तेव्हापासून त्याचा शोध सुरू होता व त्याच्याविरोधात 'लूक आऊट नोटीस' जारी करण्यात आली होती. २९ जुलैला इमिग्रेशन विभागाने बोपचेला विमानतळावरून ताब्यात घेतले व त्यानंतर त्याला सोनेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाला सोपविले. पोलिसांनी याची सूचना गार्ड्स रेजिमेंटल सेंटरला दिली होती. तेथील अधिकाऱ्यांनी त्याच दिवशी सायंकाळी त्याचा ताबा घेतला व त्याला सेंटरमधील ऑफिसर्स मेसमध्ये ठेवण्यात आले होते. ३० जुलैला त्याला भेटण्यासाठी त्याची आई व भाऊ संदेश हे आले होते. ते सायंकाळी परतल्यानंतर बोपचे त्याच्या खोलीतच होता व बाहेर सैनिक पहारा होते. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास तो बाथरूममध्ये गेला व तेथील ग्रिल तोडून त्याने पळ काढला.



# आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून झरी फाटा ते दरेगाव रस्त्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**दरेगाव :** येथे आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्या प्रयत्नातून केन्दियअर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड साहेब यांच्या डी पी सी निधीतून झरी फाटा ते दरेगाव या रस्त्याचे उद्घाटन छ. संभाजीनगर ( दक्षिण ) चे भारतीय जनता पार्टी चे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या हस्ते भुमीपुजन झाले. एल .जी गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष जि.प.छ.संभाजीनगर, विकास कापसे, खुलताबाद- गंगापूर विधानसभा निवडणूक प्रमुख तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळेगणेश नाना अधाने, सभापती पंचायत समिती खुलताबाद दिनेश अंभोरे, उपसभापती पंचायत समितीज्ञानेश्वर नलवडे, जिल्हा सचिव, युवा मोर्चा जिल्हाउपाध्यक्ष संदिप निकम ,भाजपा , जनाबाई वाघ, सरपंच पाडळी प्रभाकर शिंदे, पंचायत समिती सदस्य, शिवाजी गायकवाड, अजिनाथ लहाने , अजिनाथ जाधव अरुणभाऊ आघाडेविठ्ठल अहेवाड आपसाहेब अहेवाड राहुल गायके, सतिष आहेवाड अंकुश अहेवाड प्रशांत कदम, प्रभाकर शिंदे, सलीम शेख, आणि आदी मान्यवर आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिमुकल्यांनी गिरविले तृणधान्याचे धडे

आधुनिक केसरी न्यूज

**मुर्शिदाबाद :** 2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरा केला जात आहे .आपल्या दैनंदिन आहारामध्ये मैदा व इतर दुय्यम पदार्थांचे प्रमाण प्रचंड वाढल्याने पारंपारिक तृणधान्य बाजरी, ज्वारी, राळा , कोदो, भगर,राजगिरा यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी जनसामान्यांच्या आरोग्यात मोठ्या प्रमाणात समस्या उद्भवत असून तृणधान्याला सुगीचे दिवस यावे याकरता भारत देशाने जगभरात पुढाकार घेऊन 2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरा करण्याचे प्रयत्न सुरू केले आहे. ऑगस्ट महिन्यात मिलेट ऑफ द मंथ म्हणून राजगिरा या पिकाचा प्रचार करण्यात येत असून शालेय विद्यार्थ्यांच्या आहारात तृणधान्याचा अंतर्भाव व्हावा याकरिता प्रत्येक शाळेत जाऊन कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी राजगिरा पिकाचे प्रचार प्रसिद्धी करत आहे. याच अनुषंगाने फुलंब्री तालुक्यातील मुर्शिदाबाद



वाडी येथील जिल्हा परिषद शाळेत तालुका कृषी अधिकारी फुलंब्री यांचे पथकाने मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यार्थ्यांना राजगिरा पिकाचे महत्त्व सांगण्यात आले तसेच तृणधान्य बियाणे वाटप सुद्धा करण्यात आले. प्रसंगी तालुका कृषी अधिकारी भारत कासार मंडळ कृषी अधिकारी निवृत्तीजोरी मुर्शिदाबाद वाडी जिल्हा परिषदेच्या मुख्याध्यापिका श्रीमती काळे सरपंच श्री दीपक पवार उपसरपंच श्री जगन्नाथ पवार शालेय समिती अध्यक्ष श्री आत्माराम पवार कृषी मित्र श्री तुकाराम विटेकर हजर होते कार्यक्रमाचे नियोजन कृषी सहायक संदीप दळवी व रामभाऊ साळुंखे यांनी केले प्रसंगी विद्यार्थ्यांनी तृणधान्य शपथ सुद्धा घेतली.



# दहावीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोगवही वाटप!

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेचे माजी सभापती माननीय नरसिंग ढगे सर यांच्यातर्फे महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोगवह्यांचे वाटप करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे सन्माननीय मुख्याध्यापक शेख अहमद पटेल सर यांनी भूषवले. माननीय मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांच्या शुभहस्ते विज्ञान प्रयोग वही यांचा वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज अग्रवाल यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक,शिक्षिका श्रीमती सुनंदा आरदवाड, श्रीमती अंजली कुलकर्णी,श्रीमती मंगला महाजन, श्रीमती दिपाली औटे, व्यंकट जाधव, श्रीमती मंजुश्री राठोड, श्रीमती वैशाली देशमुख, श्रीमती शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ, श्रीमती नेहा पोळ यांनी सहकार्य केले.

# समृद्धी महामार्गावर 'बर्निंग ट्रक'; चालक बालंबाल बचावला

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा:** समृद्धी महामार्गावर ट्रकने पेट घेतल्याने वाहनाचा केवळ सांगाडाच उरला. मात्र चालकाने बाहेर उडी घेतल्याने तो बालंबाल बचावला.जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर मेहकर पासून दहा किलोमीटर अंतरावर गुरुवारी मध्यरात्री नंतर ही दुर्घटना घडली. नागपूरकडे भरवेगात जाणाऱ्या( एमएच १६ सीसी ८७३० क्रमाकाच्या ) आयशर चे समोरील टायर फुटले. यामुळे अनियंत्रित झालेल्या वाहनाने पेट घेतला. वाहन रसायनसदृश्य पदार्थ घेऊन जात असल्याने आग जास्तच भडकली. घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन दलाने केलेल्या शर्थीच्या प्रयत्नानंतर आग विझली खरी ,पण वाहनाचा केवळ सांगाडाच उरला आहे. दरम्यान, टायर फुटण्याचा आवाज येताच चालक सचिन लक्ष्मण खेडकर( राहणार शिवगाव, जिल्हा अहमदनगर ) याने बाहेर उडी मारल्याने तो सुखरुप बचावला.





# गोमंतकीय कवितेत लांजावासीय चिंब ! मुचकुंदीच्या भेटी मांडवी आलीसे।

आधुनिक केसरी न्यूज

**लांजा (रत्नागिरी) :** महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या लांजा शाखेने गोव्यातील कवि- कवयित्रींचा 'गंध मातीचा छंद कवितेचा' हा आगळावेगळा व गोमंतकीय संस्कृती व कवितेचे दर्शन घडविणारा कवितेचा व गोमंतकीय ओव्या व लोकगीतांचा कार्यक्रम अलीकडेच आयोजित केला होता.

लांजा असो वा गोवा, मानवी जीवन भावजीवन सर्वत्र तेच आहे. फरक असेल तर तो थोडाफार तपशिलाचा. गोमांतकीय भूमीच्या प्राकृतिक सौंदर्याइतकाच इथल्या लोकवाङःमयीन संस्कृतीचा गंध व कवितेची अमीट गोडी ही रसाळ, गोमटी असून, ा निमित्ताने गोमंतकीय लोकवाङ्मयीन संस्कृती व कवितेचे मनोज्ञ दर्शन घडविणा-या कार्यक्रमातून मुचकुंदीच्या ( नदीच्या )भेटीला साक्षात मांडवी भेटायला आली, असे मत महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या शाखेचे लांजाचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. विलास कुवळेकर यांनी व्यक्त केले.
लांजा शहरातील माऊली सभागृहात स्त्री - पुरुष प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओव्यांच्या साथीने जात्यावर दळण दळले जात होते आणि त्यातून जणू गोमंतकीय कवितेचे पीठ पडत होते. जोडीला नैसर्गिक पाऊसही अधूनमधून बरसत होता. या अनोख्या समारोहात लांज्यातील रसिक न्हाऊन निघाले. या कार्यक्रमाच्या आयोजकांचे कौतुक करावेसे वाटते अशी प्रतिक्रिया या कार्यक्रमाचे वृत्तांकन करण्यासाठी खास रत्नागिरीहून आलेले कोकण मीडियाचे संपादक ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कोनकर यांनी दिली. गोव्याच्या भूमीत इंग्रजी व कोकणी भाषेचे प्रभुत्व असतानाही माय मराठीची सेवा करतानाच तिची थोरवी गाण्यासाठी आयोजिलेल्या 'गंध मातीचा छंद कवितेचा' या कार्यक्रमातून गोमंतकीय भूमीतील लोकसाहित्याच्या प्रसिद्ध अभ्यासिका पौर्णिमा केरकर, गझलकार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, सामाजिक कार्यकर्त्या कवियित्रि चित्रा क्षीरसागर, गोव्यातील साहित्य विश्वात आपल्या साहित्यकृतींनी मुद्रा उमटविणा-या दीपा मिरिंगकर, आसावरी कुलकर्णी, शुभदा च्यारी, रजनी रायकर व विठ्ठल शेळके या प्रामुख्याने मराठी भाषेत लेखन करणा-या साहित्यिकांनी एकापेक्षा एक सरस व सकस कवितांचे वाचन करित गोमंतकभूमीतील लोकजीवन, स्त्रीजीवन, निसर्ग व संस्कृती यांचे सप्तरंगी कोलाज उलगडून दाखविले. त्याला लांज्यातील संस्कृतीप्रेमी साहित्यरसिकांनीही टाळ्यांच्या कडकटाने मनमुराद दाद दिली.



या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमात चित्रा क्षीररसागर यांनी सादर केलेली 'आताशा पोरी' ही कविता एकविसाव्या शतकातील नव्या आत्मनिर्भर स्त्रीशक्तीचा प्रत्यय करुन देणारी ठरली. लोकवाङ्मयाच्या अभ्यासिका पौर्णिमा केरकर यांनी सादर केलेल्या 'बापांनी पुरयिले' या कवितेतून बाप-मुलीच्या नात्यातील हृदयस्पर्शी नातेसंबधांवर भाष्य केले.' असे असावे जीवन माझे आयुष्यात एकदा फुलावे' ही सात वर्षातून एकदा कोकणातील कातळसड्यांवर उगविणा-या 'कारवी' या वनस्पतीचे जीवनगाणे गाणारी आसावरी कुलकर्णींची कविता, 'आज भूमी श्रावणाने धुंद झाली कोंब येता पावसाने धुंद झाली' या प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या गझलेला रसिकांनी टाळ्यांनी दाद दिली. रजनी रायकर यांनी 'बाप मायेचा झरा' तर दीपा मिरिंगकर यांनी 'तू आषाढीला जा मी कार्तिकीला जाईन' विठ्ठल शेळके याने त्याच्या बोलीभाषेतील तर शुभदा च्यारी हिने आपल्या कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. विठ्ठल शेळके व शुभदा च्यारी या द्वयीच्या आशयघन व ओघवत्या निवेदनाने श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध झाला. 'युगाचा अंत' 'झाड कोसळंत' ही, पाण्याआधी वळण बांधावं सखी, इकडे तिकडे चहुकडे पाणीच पाणी चहुकडे,' आदि कविता व गझलांनी श्रावणधारा बरसण्याच्या पूर्वसंध्येलारत्नागिरी जिल्ह्यातील लांजा सारख्या छोटेखानी शहरात निसर्गरम्य व साहित्याची खाण असलेल्या गोमंतकीय भूमीतील तब्बल आठ कवी - कवयित्री एकाच मंचावर येण्याची ही पहिलीच वेळ होती.
उद्घाटनप्रसंगी प्रसिद्ध कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या चित्राताई क्षीरसागर, न्यू एज्युकेशन सोसायटी लांजाचे अध्यक्ष जयवंत शेट्ये, कार्यवाह विजय खवळे, लोकमान्य वाचनालय लांजाचे उपाध्यक्ष योगेश वाघधरे, राजापूर लांजा तालुका नागरिक संघ मुंबई शाखा लांजाचे अध्यक्ष किरण बेर्डे आदि मान्यवर व्यासपीठावर होते.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मसापच्या विजयालक्ष्मी देवगोजी, विजय हटकर, महेंद्र साळवी, लोकमान्य वाचनालयाचे अध्यक्ष ऍड. अभिजित जेधे, योगेश वाघधरे, उमेश केसरकर, रामचंद्र लांजेकर यांनी विशेष मेहनत घेतली. उद्घाटन समारंभाचे निवेदन विजय हटकर यानी केले. आभार उमेश केसरकर यांनी मानले.



# ३० हजारांत प्रेयसीच्या पतीची सुपारी देऊन हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** प्रेयसीला तीचा पती त्रास देत असल्यान प्रियकराने तीच्या पतीचा गेम खल्लास करायचे ठरविले. ३० हजार रुपयात नेर येथील दोन युवकाला खुन करण्याची सुपारी दिली. कामावरुन गावी परत जात असता मांगकिन्ही येथील प्रेयसीच्या पतीवर प्राणाघातक हल्ला चढवुन त्याचा खात्मा केल्याची कबुली संशयीत आरोपीने दिली आहे. या प्रकरणी दारव्हा पोलिसांनी दोन आरोपीला जेरबंद केले असून, एक आरोपी फरार आहे.

उमेश सदाशिव चव्हाण वय २७ वर्ष रा. मांगकिन्ही असे मृतकाचे नाव आहे. शंकर प्रेमसिंग चव्हाण वय २२ वर्ष रा. मांगकिन्ही , रामा शंकर जाधव वय २९ वर्ष रा. सिंदखेड असे संशयीत आरोपीची नावे आहे. दारव्हा येथे डायल ११२ वरून दिनांक १/८/२०२३ रोजी रात्री ८. ४५ वा. कॉल आला. एक इसम दारव्हा ते कुपटा रोडवर जिनींग जवळ नालीत जखमी अवस्थेत पडून आहे. त्याचे डोक्याला मार लागलेला दिसत असून रक्त निघत आहे. तात्काळ मदत पाठवा अशा मॅसेज वरून पोस्टे दारव्हाचे पोलीस निरीक्षक विलास कुळकर्णी यांच्यासह कर्मचा-यांनी घटनास्थळ गाठले. जखमीला उपचारा करीता उपजिल्हा रुग्णालय दारव्हा येथे दाखल केले. पोहवा सुनिल राठोड यांचे लेखी रिपोर्टवरून अप क ३०७ भादवि चा दाखल केला. जखमी इसम मांगकिन्ही येथील उमेश सदाशिव चव्हाण वय २७ वर्ष असल्याचे निष्पन्न झाले. दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वा उपचारादम्यान श्री बंसतराव नाईक शासकीय रूग्णालय यवतमाळ येथे मरण पावला. सदर गुन्हयात कलम ३०२ भादंवि समाविष्ट करण्यात आले. ठाणेदार पोलीस निरिक्षक विलास कुलकर्णी यांचे मार्गदर्शनात पोउपनि धनंजय रत्नपारखी, पोहवा सुनिल राठोड, पोहवा रवी मोर्लेवार, पोहवा सुशिल चेके, नापोकॉ सुरेश राठोड, पोकॉ अमोल सोनुने यांचे तपास पथक तयार केले. मांगकिन्ही येथे सखोल तपास केला असता जखमी इसम याचे पत्नीचे गावातीलच शंकर चव्हाण याचे सोबत प्रेमसंबंध असून त्यानेच उमेश चव्हाण यास जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी संशयित शंकर चव्हाण यास ताब्यात घेतले असता त्याने गुन्हयाची कबूली दिली. मृतक हयाचे पत्नीसोबत प्रेमसंबंध होते. मृतक हा त्याचे पत्नीस मारहाण करायचा. त्यामुळे मृतक उमेश चव्हाण याचा खुन करण्यासाठी नेर तालुक्यातील रामा शंकर जाधव वय २९ वर्ष रा. सिंदखेड व अन्य एकाला ३० हजार रुपयांमध्ये सुपारी दिली.

पोलीसांची दोन पथके तयार करून ईतर आरोपी याचा शोध घेतला असता आरोपी रामा शंकर जाधव यास सिंदखेड येथून ताब्यात घेतले. तर अन्य एक आरोपी हा घटना तारखेच्या रात्रीपासून घरी नसल्याचे त्याचे घरच्यांनी सांगीतले. ताब्यात घेतलेले आरोपी शंकर प्रेमसिंग चव्हाण आणी रामा शंकर जाधव याना दि.२ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली. उर्वरीत आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. आरोपीला आज रोजी न्यायालय दारव्हा येथे हजर करुन ७ दिवस पोलीस कोठडी मिळविली. सदरचा तपास. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. पवन बनसोड, अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, सहायक पोलीस अधीक्षक तथा उप विभागीय पोलीस अधिकारी दारव्हा आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार दारव्हा पोलीस निरिक्षक विलास कुलकर्णी करत आहे.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे 8 वे राष्ट्रीय अधिवेशन 7 ऑगस्ट रोजी तिरुपतीत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे 8 वे राष्ट्रीय अधिवेशन 7 ऑगस्ट 2023 रोजी तिरुपती एस.व्ही. विद्यापीठात होणार आहे. या अधिवेशनात जातनिहाय जनगणना व्हावी, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करण्यात यावे, ओबीसी समाजावर लादण्यात आलेली क्रिमी लेयरची असंवैधानिक अट तात्काळ रद्द करण्यात यावी, क्रिमी लेयरची मर्यादा वाढवून रु. रद्द होईपर्यंत 20 लाख, मंडल आयोग, स्वामीनाथ आयोगाच्या सर्व शिफारशी लागू करा, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देऊन सन्मानित करा, ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत आरक्षण लागू करा, आदी मागण्यांवर सखोल चर्चा होणार आहे. सदर अधिवेशनाला देशातून मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित राहणार असून यात अनेक मान्यवर मार्गदर्शन करणार आहे. होणाऱ्या अधिवेशनात चंद्रपुरातून सुद्धा हजारो ओबीसी बांधव जाणार आहे.

अशी महिती बबनराव तायवाडे, सचिन राजूरकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे चे संचालक दिनेश चोखारे, यांनी माहिती दिली.

# महसूल सप्ताहनिमित्त शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथील दुय्यम निबंधक कार्यालय यांच्या वतीने महसूल दिन सप्ताह निमित्त शहरातील शिवाजी महाविद्यालयात महसूल दिनाचे औचित्य साधत युवा संवाद कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची, युवकांशी दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रमुख अधिकारी युवराज बैसाने यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते बोलताना म्हणाले की, महसूल विभागाची नाळ ही आज तळागाळातील जनतेशी थेट जुळलेली आहे. त्यामुळे महसूल व इतर विभागाने वर्षभर केलेल्या विविध लोकाभिमुख कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्यासाठी दरवर्षी १ ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून राज्यभरात साजरा करण्यात येतो. यावर्षी मात्र महसूल सप्ताह आयोजित करून या अभियानाला व्यापक स्वरूप देण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे, असे त्यांनी सांगितले तसेच शासनाच्या विविध योजना संदर्भात विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. महसूल दिनानिमित्त युवा संवाद कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना दुय्यम निबंधक अधिकारी युवराज बैसाने यांनी उत्तरे दिली. यामध्ये महसूल विषयक कागदपत्रे, शासनाच्या विविध योजना, देशातील जडणघडणीत विद्यार्थ्यांची भूमिका अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच दुय्यम निबंधक कार्यालयाच्या विभागातील उपयुक्त विविध माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित मान्यवरांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
कार्यक्रमात विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी दुय्यम निबंधक अधिकारी युवराज बैसाने, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक प्रा.योगीराज सोमवंशी, दुय्यम निबंधक कार्यालयाचे कनिष्ठ लिपीक अक्षय सुगंधी, कनिष्ठ लिपीक संजय चव्हाण,रामु राठोड यांच्यासह दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यांची व महाविद्यालयातील प्राध्यापकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# १५ दिवसांच्या बाळाला डोळ्याची लागण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात सध्या काही दिवसापासुन अनेक भागात डोळे येण्याची विषाणुजन्य साथ येताना दिसत आहे. शहरातील अनेक वार्डात सध्या डोळ्याची साथ आलेल्या रुग्णांची संख्या वाढतांना पाहायला मिळत आहे. परंतु शहरातील काही भागात लहान बाळांना डोळयांची लागण झाली आहे त्यात रमाई नगर येथील १५ दिवसाच्या बाळाला देखील डोळे येण्याची लागण झाली आहे.महानगर पालिका डॉक्टरांनी वापरण्याचा सल्ला दिला आहे व डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कुठलाही इतर ड्रॉप वापरू नये असेही आवाहन केले आहे.

डोळयाचा विषाणुजन्य हा मुख्यत्वे ॲडिनो वायरसमुळे होतो. डोळ्याचा विषाणु ससंर्गजन्य हा सौम्य प्रकारचा ससंर्ग असला तरी देखील याबाबत जनतेने आवश्यक काळजी घेणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे डोळ्याची साथ आल्यास नागरिकांनी स्टेरॉईड आईज् ड्रॉपचा वापर टाळावा असे आवाहन महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे. तर डोळ्यांचा त्रास होत असल्यास तत्काळ महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी, असे डॉक्टरांनी आवाहन केले आहेत.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# महसूल विभाग शासनाचा कणा

## तहसीलदार राजेश सरवदे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**एकनाथ आवचार चारठाणकर**

**चारठाणा :** शासनाने २००२ पासून महसूल दिन साजरा करण्याचे घोषित केले. तेव्हापासून १ ऑगस्ट हा दिवस महसूल दिन म्हणून पाळला जातो या निमित्त महसूल सप्ताह राज्याच्या गतिमान प्रशासनामध्ये महसूल विभाग सातत्याने अग्रस्थानी आहे. निवडणूक, नैसर्गिक आपत्ती या काळात महसूल विभाग अहोरात्र काम करीत असतो. तसेच राज्यापासून खेडेगावापर्यंत शासनाची धुरा सांभाळणारा महसूल विभाग शासनाच्या अनेक विभागांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत असतो. महसुल विभाग हा शासनाचा कणा आहे असे प्रतिपादन जिंतुर तहसीलदार राजेश सरवदे यांनी येथील ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित महसुल दिन कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी नायब तहसीलदार पी.बी.राखे, जिंतुर तलाठी एम.एम. पठाण, आर.एन.गायकवाड सरपंच अनिरुद्ध चव्हाण, ईद्रंजीत घाटुळ, वाजेद कुरेशी, मधुकर भवाळे, स.मुस्ताक अहेमद पत्रकार, शिवशंकर तमशेटे, गणेश पारवे, नानासाहेब निकाळजे, स. खलील रामभाउ देशमुख, गोपीनाथ राठोड, पत्रकार एकनाथआवचार, खालेक देशमुख, गजानन क्षीरसागर, जलील ईनामदार, सुभाष पवार, कपिल तायरे, जिवन भवरे, भवरे, लक्ष्मण तमशेटे, शाम नवलाखे, जिवन कंठाळकर ( स्वामी ), संतोष भुते, रत्नाकर सासनिक शिवराज गजमल, सुधाकर तमशेटे, शाबेर स.मनताया स्वामी, शहजाद देशमुख, आदींसह शेतकरीवर्ग उपस्थित होते. पुढे बोलताना तहसीलदार म्हणाले की, महसूल दिनाची सुरुवात ०१ ऑगष्टला होऊन संपूर्ण महसुली कामे, जबाबदारी, पिकपाहणी, विविध महसुली नमुने हे अद्यावत करून प्रारंभ करण्यात येते. यामध्ये जनतेचा महसूल प्रशासनाच्या प्रती असलेला विश्वास तसेच महसूल अधिकारी यांच्याकडे समस्या सोडविण्याची क्षमता असत असेही ते म्हणाले या २०२२-२०२३ या वर्षातील ई पिक पाहणी करण्यास महसूल प्रशासनाला लोकप्रतिनिधींकडून व गतिमान करण्याकरिता उत्कृष्ट कामगिरी करावीत महसूल विभाग प्रशासनाला सहकार्य करावेत.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय चे दत्ता कांबळे, स. अली, मुकुंद मुंजे, पिंटु मुजमुले यांच्यासह ग्रामपंचायत कार्यालय चे कर्मचाऱ्यांसह येथील सर्व शेतकरी व तरुण वर्ग यांनी परिश्रम घेतले आहेत.

# अरूणा सबाने यांच्या साहित्यात 'स्त्री-पुरूष एकात्म जाणिवेचा अट्टाहास'

## डॉ. शोभा रोकडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** डॉ.अरूणा सबाने यांची साहित्य निर्मिती ही स्वानुभवावर आधारीत असून. जगतांना वाट्याला आलेले अनुभव त्यांनी प्रांजळपणे अभिव्यक्त केले. अत्यंत धाडसाने आपली मतं नोंदवली. एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून निराधार महिलांना आधार दिला, स्त्री प्रश्न तळाशी ठेऊन 'स्त्री -पुरूष एकात्म जाणिवेचा' अट्टाहास आपल्या लेखणीतून समर्थपणे साधला' असे प्रतिपादन अमरावती येथील सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका, कवयित्री प्राचार्य डॉ.शोभाताई रोकडे यांनी केले.

कृषी विकास प्रतिष्ठान, नागपूरच्या वतीने दिला जाणारा 'सोमेश्वर पुसतकर स्मृती पुरस्कार' वितरण समारंभात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी सद्यस्थितीत महिलांची सामाजिक कार्याबाबतची उदासिनता व केवळ प्रसिद्धीचा हव्यास यावर त्यांनी आपली परखड मतं मांडली. अरूणाताईंचा संघर्ष लक्षणीय असून त्यातून महिलांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहनही केले. आपले जीवन व्यर्थ न घालवता आयुष्याचा खरा सन्मान अरूणाताईंनी कसा केला यावर त्यांनी भरभरून प्रकाश टाकला व अरूणाताईंच्या कार्याचे कौतुक केले. लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या अरूणा सबाने यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखदेवराव थोरात यांच्या हस्ते कृषीविकास प्रतिष्ठान, नागपूरचे अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आला. एक लक्ष रूपये रोख, स्मृतिचिन्ह, शॉल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.अरूणाताईंचे नातू अर्णव शर्मा यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

अरूणा सबाने यांनी लेखनाला कृतीची जोड दिली. त्यामुळे त्यांचे लेखन अधिक सकस ठरले. असे मत डॉ सुखदेवराव थोरात यांनी व्यक्त केले तर गिरीश गांधी यांनी 'कृतीशीलतेमुळे अरूणा सबाने यांच्या कामाला महत्व आले.निष्ठेने केलेल्या त्यांच्या कामाची म्हणूनच आज दखल घेतल्या गेली' अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करून, परिवर्तनासाठी केलेल्या अरूणाताईंच्या प्रयत्नांसाठी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा दंडिगे यांनी तर आभार अरूण वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाला सोमेश्वर पुसतकर यांच्या पत्नी वृषाली पुसतकर, डॉ.विमल थोरात निलेश खांडेकर, श्रीराम काळे व कृषीविकास प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी सामाजिक, साहित्यिक क्षेत्रातील मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती.



# मराठा सेवा संघाच्या वतीने बाबाराव पाटील खडसे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जेष्ठ नेते तथा शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विश्वासू सहकारी सन्माननीय बाबारावजी पाटील खडसे यांची नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती झाली आहे. त्या अनुषंगाने मराठा सेवा संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

मराठा सेवा संघ ही केवळ संघटनाच नव्हे; तर सामजिक कार्यासाठी झटणारी विश्वव्यापी चळवळ आहे. सामाजिक कार्यात बाबाराव पाटील खडसे यांचा नेहमी सहभाग असतो. मराठा सेवा संघाच्या कार्यात वेळोवेळी त्यांचे सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन लाभत असते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मराठा सेवा संघाच्या सूत्रांनी दिली आहे.

सत्काराला उत्तर देताना खडसे पाटील म्हणाले की, मराठा सेवा संघाच्या पाठीशी छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज यांचा आदर्श असल्याने या चळवळीचा विस्तार जगभरात झाला आहे. तद्वतच, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांचे विचार शिव, शाहू,फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचार सरणीचे असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तळागाळातील लोकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. पक्षाने टाकलेली जबाबदारी प्रमाणिकपणे पार पाडून, समाजाला अभिमान वाटेल असे काम करणार असल्याचे आश्वासन सत्कारमूर्ती बाबाराव पाटील खडसे यांनी दिले.

याप्रसंगी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवश्री शिवाजी कव्हर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाउपाध्यक्ष आर्जून पाटील खरात, मराठा सेवा संघाचे विजय बोरकर, धनंजय देशमुख, प्रा. जानराव देशमुख, विठ्ठल सरनाईक, दिलीप भिसडे, सचिन देशमुख, रुपेश बाजड, गजानन देशमुख, गोपाल खडसे, अमोल मोरे, ग्रामसेवक अवचार साहेब, प्रा. हाडे सर, प्रा. बदर सर, राजेश काळबांडे, विजय साखरे, साईनाथ शिंदे, संतोष बिल्लारी, सतिष नरवाडे आदीसह, मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडचे बहूसंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# चार लाख रुपयांचे बिल ग्रामसेवकाने परस्पर काढले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील वरठाण येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने १५ व्या वित्त आयोगातून चार लाख रुपयांचे पेव्हर ब्लॉक काम मला देण्यात आले होते सदरील काम पूर्ण केलेले असतांना मला त्या कामाचे बिल न देता तत्कालीन ग्रामसेवक विजय जोधंळे व त्या कामावरील आपले सरकार सेवा केंद्राचे तालुका सन्मयक पंचायत समिती सोयगाव निलेश शेजवळ ह्या दोघांनी सघंनमताने पुर्ण रक्कम काढुन घेतले असुन सदरील कामाचे बिल मला १५ ऑगस्ट पर्यत न मिळाल्यास ग्रामपंचायत कार्यालयासमोर आत्मदहन करणार, असे लेखी निवेदन नंदूबापु सोळंके यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी औरंगाबाद व सोयगावचे तहसिलदार यांच्याकडे देण्यात आले आहे.

१५ व्या वित्त आयोगातून सन २०२१ ते २२ मध्ये येथील ग्रामपंचायतने चार लाखांचे पेव्हर ब्लॉकचे काम नदुबापु सोळंके यांना देण्यात आले होते.सदरील काम त्यांनी काही दीवसातच पुर्ण केले असुन त्या कामाची बिले माझ्याकडे असुन बिले पंचायत समितीमध्ये दाखल न करता सदरील कामाचे पुर्ण रक्कम तत्कालीन ग्रामसेवक विजय जोधंळे व आपले सेवा सरकार केंद्राचे तालुका सन्मयक पंचायत समिती सोयगाव नीलेश शेजवळ ह्या दोघांनी सघंनमताने काढून घेतलेली आहे.

वेळोवेळी कामाची काढलेली रक्कम जोधंळे यांच्याकडे मागितली असता उडवाउडवीची उत्तरे मिळतात.सदरील कामावर वापरलेली ब्लॉक सिमेंट खडी मजुरी देण्याचे देयक बाकी असुन मला ह्या कामाचा एकही पैसा मोबदला स्वरूपात मिळालेला नाही.

या प्रकरणी गटविकास अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी लेखी निवेदन दीलेले असुन त्यांनी ह्या प्रकाराची चौकशी केलेली नाही.या प्रकाराची चौकशी करुन त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी व १५ ऑगस्ट पर्यत सदरील केलेल्या कामाची पुर्ण रक्कम न मिळाल्यास मी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे नंदुबापु सोळंके यांनी दीला आहे.



# जॉईंट सेक्रेटरींच्या माध्यमातून 90 दिवसांत चौकशी अहवाल

## आ. प्रतिभा धानोरकर यांच्या लक्षवेधीवर उद्योगमंत्री उदय सामंत यांचे विधानसभेत उत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** तालुक्यातील ताडाळी येथील एमआयडीसी परिसरात धारिवाल पावर प्लॅंटच्या विविध समस्यांसंदर्भात महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडण्यात आली. त्यावर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या उत्तरावर समाधानी नसल्याची प्रतिक्रिया आमदार प्रतिभा धानोरकर यांनी दिली. या पावर प्लांट च्या संदर्भात एक समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यावर उत्तर देताना धारिवाल कंपनीने केलेल्या प्रदूषणासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी जॉईट सेक्रेटरी यांच्या माध्यमातून 90 दिवसाच्या आत चौकशी केली जाईल आणि सदर कंपनी दोषी आढळल्यास शासनामार्फत कारवाई केली जाईल, असे आश्वासन उद्योगमंत्री यांनी दिले.



धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. प्लॉट नं.सी.-६, सी-७ व सी-८ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ताडाळी, ता. जि. चंद्रपूर हा कोळशावर आधारीत औष्णिक विद्युत प्रकल्प कार्यान्वित आहे. सदर प्रकल्पामध्ये ६०० मेगावॅट वीजनिर्मिती होते. धारिवाल पावर प्लॅंट अस्तित्वात आल्यापासून प्लॅंटमध्ये जुन्या मशनरींचा वापर होत आहे. प्लॅंटमुळे सभोवतालच्या परिसरात प्रदूषण होत असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये निदर्शनास आले. या प्लॅंटद्वारे वर्धा नदीच्या पात्रातून पाणी चोरी केली जाते. या प्लॅंटमुळे तयार होणारी राख शेतकऱ्यांच्या शेतात पसरून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. कंपनीद्वारे शेतकऱ्यांना कुठलीही मदत मिळत नाही. या कंपनीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वारंवार अपघात होत असतात.

**भाजपचे आमदार आशिष शेलारली असमाधानी :** दरम्यान उद्योग मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरावर भाजपचे आमदार आशिष शेलार यांनी मत व्यक्त करताना मंत्र्यांच्या उत्तरात तफावत असल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली . सदर कंपनीने प्रदूषण केल्याचे स्पष्ट झालेले असताना पुन्हा चौकशी करून कारवाई केली जाईल, असे दिलेले आश्वासन संयुक्तिक वाटत नाही, अशी टीका देखील शेलार यांनी केली आहे .

त्यामुळे या कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे. मागील काळात दिवंगत खासदार स्वर्गीय बाळूभाऊ धानोरकर यांच्या माध्यमातून सदर पावर प्लांटच्या विरोधात आंदोलन उभारले होते. त्यादरम्यान आज उत्तर दिलेल्या अधिकाऱ्यांनी सदर पावर प्लांट च्या संदर्भात अनेक त्रुटी काढल्या होत्या. त्या पावर प्लांट संदर्भात असणाऱ्या त्रुटींची काही छायाचित्रे देखील आज उपलब्ध आहेत. जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले होते. मात्र, लक्षवेधी दरम्यान धारीवाल पावर प्लांट च्या संदर्भात असमाधानकारक उत्तरे देऊन दिशाभूल केली जात आहे. आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले की, एमआयडीसी ताडाळी येथे असलेला धारिवाल विद्युत प्रकल्प हा बेकायदेशीररित्या कार्यान्वित आहे. धारिवाल विद्युत प्रकल्पात पाणी स्टॉक करण्याकरिता जो रिझर्व वायर आहे तो पूर्णपणे चुकीचा बांधला आहे. संपूर्ण भारतात कुठल्याही विद्युत प्रकल्पात असा बांधला गेलेला नाही. त्या चुकीच्या बांधकामामुळे तो पाणीसाठा बाराही महिने झिरपत असतो. त्यांच्यामुळे लगतच्या परिसरातील शंभर एकर शेती बाधित होत आहे. संबंधित कंपनी शेतकऱ्यांना कुठलीही नुकसान भरपाई देत नाही. धारिवाल विद्युत प्रकल्पाला जो पाणीपुरवठा वढा या गावावरून होतो, त्या गावातील नदीपात्रात या कंपनीने अवैध इंटक वेल बांधलेला आहे. कुठल्याही विद्युत प्रकल्पाचा इंटक वेल हा नदीपात्रात नसतो. कंपनीने पुन्हा चार पंप अवैधरित्या नदीच्या खोल भागात प्रवाह बदलून टाकला असल्याने उन्हाळ्यात आसपासच्या गावांना पिण्याच्या पाण्याचा व जनावरांसाठी पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. धारिवाल कंपनीच्या वायू प्रदूषणामुळे लगतच्या दहा ते पंधरा गावांना विविध आजारांनी ग्रासले आहे. शेत पिकांवर सुद्धा कोळशाच्या राखेचा थर जमा होऊन शेत नापिकी होत असल्याचे दिसून येत आहे. धारिवाल विद्युत प्रकल्प हा चंद्रपूर नागपूर राज्य महामार्गावर स्थित असल्याने सदर प्रकल्पात येणारे ट्रक व ट्रेलर्स हे राज्य महामार्गावर उभे असतात. त्यामुळे वाहतुकीचा देखील गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या जड वाहनांमुळे अनेक अपघात झाले आहेत. सदर कंपनीवर कारवाई करण्याची मागणी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.

## कापूस पिकावरील दुसरी फवारणी करा : कृषी पर्यवेक्षक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी या कीटकनाशकापासून, बोंडअळी, मावा आणि पांढरी माशीपासून सावधान राहावे असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील यांनी शेतकऱ्यांना केले आहे.



कापसाच्या पिकाला जवळपास एक महिना होऊन गेला. गेल्या काही दिवसांपासून रिमझिम पाऊस पडत आहे. त्यामुळे कापूस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्यामुळे हा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कापूस पिकावर दुसऱ्या फवारणीची आवश्यकता आहे. दुसऱ्या फवारणीमध्ये कोणते कीटकनाशक करावे त्यामुळे किडींचे नियंत्रण होईल.शेतकऱ्यांना, जास्तीत-जास्त उत्पादन घेण्यासाठी कपाशीची नियमित फवारणी करणे आवश्यक आहे. कापूस पिकावर दुसरी फवारणी करताना, पिकाची एकूण गुणवत्ता वाढविण्यासाठी कीटकनाशकासह विद्राव्य खत किंवा टॉनिक वापरण्याची गरज आहे. कापूस पिकावर दुसरी फवारणी करताना औषधाचे प्रमाण योग्य असावे. कंपनीने दिलेले औषध वापरावे आणि फवारणी करताना एकाच वेळी जास्त औषधाची फवारणी करू नये. पावसाचे पाणी आणि जास्त काळ साठलेले पाणी फवारणीसाठी वापरणे टाळावे. आज दुपारी पाऊस पडत आहे, त्यामुळे फवारणी करताना स्टिकर्स वापरा. Ulala,Saaf,Mahadhan व Isabion अश्या औषधाची फवारणी शेतकऱ्यांनी करावी औषधाची निवड करताना कृषी सहाय्यक किंवा कृषी सेवा केंद्र चालकाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

फवारणी करताना औषधाची मात्रा कमी किंवा जास्त असल्यास फवारणी केलेल्या पिकाचे नुकसान होऊ शकते. फवारणी प्रक्रियेदरम्यान एकाच वेळी जास्त प्रमाणात औषध फवारले तर ते पिकांना हानी पोहोचवू शकते. पावसाचे पाणी आणि जास्त काळ साठलेले पाणी किंवा मग अती गढूळ पाणी फवारणीसाठी वापरले तर त्या कीटकनाशकाचा 100% निकाल मिळत नाही.त्याकरीता शेतकऱ्यांनी चांगले स्वच्छ पाणी घ्यावे असेही कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील यांनी सांगितले.



## ७० तासांनंतर ४ मजुरांचे मृतदेह सापडले

आधुनिक केसरी न्यूज

**गणेश चोपडे**

**इंदापूर :** म्हसोबाचीवाडी, ता.इंदापूर येथील विहिरीची रिंग तयार करत असताना मातीचा ढिगारा ढासळून त्याखाली गाडले गेलेल्या ४ मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात एनडीआरएफ पथकाला ७० तासांनंतर यश मिळाले. ७० तास उलटून गेल्यामुळे मातीच्या ढिगाऱ्याखाली जिवंत मजूर मिळण्याची आशा मावळली होती आणि प्रत्यक्षात तेच वास्तव समोर आले. मृतदेह बाहेर काढताच मृतांच्या नातेवाइकांनी न्याय मिळाल्याशिवाय मृतदेह हलवू देणार नसल्याचे प्रशासनाला सांगितले.

म्हसोबावाडी येथे खडी क्रेशर साठी दगड काढून त्याठिकाणी झालेल्या अक्राळविक्राळ खड्याला विहिरीचे रूप देवून रिंग टाकण्याचे काम सुरु होते.तर हे काम करताना कोणतीही खबरदारी न घेतल्यामुळे रिंग बांधताना अपघात होऊन ४ मजूर मातीच्या खाली गाडले गेले होते. त्यांना जिवंत काढण्यासाठी एन.डी आर एफ पथक गेल्या दोन तीन दिवसांपासून अविरत पणे काम करीत होते.मात्र अनेक प्रयत्न करूनही मजूर ज्या ठिकाणी गाडले गेले होते त्या ठिकाणी पोहोचता येत नव्हते अखेर पूर्व बाजूला सुरु केलेले खोदकाम थांबवून दुसऱ्या बाजूला रॅम्प तयार करून मशीन खाली उतरवण्यात आल्या.आणि तब्बत ७० तास उलटून गेल्यावर सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एका कामगाराचा मृतदेह मिळून आला.त्यानंतर शोधकार्य सुरु ठेवून ३ मजुरांचे मृतदेह विहिरीच्या बाहेर काढण्यात आले.मृतदेह बाहेर काढताच नातेवाईक यांनी हंबरडा फोडून रडण्यास सुरवात केली.त्यामुळे तेथील वातावरण अगदी रडण्या ओरडण्याच्या आवाजाने भारावून गेलेले दिसून आले. मृतदेह ॲम्ब्यूलंस मध्ये ठेवताच मृतकाचे नातेवाइकांनी वाहन अडवून जोपर्यंत यातील दोषींना अटक करून न्याय मिळत नाही तो पर्यंत मृतदेह हलवू देणार नसल्याचे सांगितले.तर विहीर मालकावर तसेच रिंगच्या कंत्राटदार याच्यावर गुन्हा नोंद करून भरपाई देण्याची मागणी केली जात आहे. तर हा अपघात होता कि घातपात याची चौकशी करण्याची मागणी समोर येत आहे.

राज्य शासनाने या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर